सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ४ थे ❑ अंक - २४ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## राजस्थानमधील एका कारखान्यात भीषण स्फोट अग्नितांडवात सात जणांचा जळून मृत्यू

### संपूर्ण औद्योगिक परिसरात भीतीचं वातावरण



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६खैरथल : राजस्थान**

राजस्थानमधील खैरथल जिल्ह्यातील खुसखेडा औद्योगिक क्षेत्रात सोमवारी (१६ फेब्रुवारी) सकाळी एक मोठी दुर्घटना घडली. येथील एका कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटामुळं आग लागली. या आगीच्या घटनेत सात जणांचा मृत्यू झाला. तसंच या घटनेनंतर संपूर्ण औद्योगिक परिसरात भीतीचं वातावरण पसरलं आहे.

अग्निशमन अधिकारी राजू खान यांनी सांगितलं की, स्फोटाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना करण्यात आल्या. कारखान्यात पुठ्ठ्याचा मोठा साठा असल्यामुळं अग्निशमन दलाला आग विझवणं कठीण झालं. त्यामुळं सुरक्षिततेच्या कारणास्तव, जवळील इतर कारखाने रिकामे करण्यात आले आणि परिसरातील वीजपुरवठा खंडित करण्यात आला. यानंतर अथक परिश्रमानंतर कारखान्यातील आग आटोक्यात आणण्यात आली.

दरम्यान, बंद असलेल्या कारखान्याला आग लागल्याचं सुरुवातीला म्हटलं जात होतं. मात्र, जेव्हा अग्निशमन दलाच्या जवानांनी आत प्रवेश केला, तेव्हा सात जण जिवंत जाळल्याच्या वृत्तानं सर्वांनाच धक्का बसला. माहिती मिळताच भिवाडीचे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि प्रशासकीय कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. तसंच अग्निशमन दलाकडून मोठ्या प्रमाणात रेस्क्यू ऑपरेशन करण्यात आले.मिळालेल्या माहितीनुसार, औद्योगिक क्षेत्रातील प्लॉट क्रमांक ऋ-१, ११८ वर असलेला हा कारखाना अनेक महिन्यांपासून बंद होता. सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास, कारखान्यातून अचानक दाट, काळा धूर येऊ लागला. काही सेकंदातच आगीनं संपूर्ण कारखान्याच्या इमारतीला वेढले. प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं की, आगीदरम्यान तीन ते चार स्फोट झाले. यामुळं आजूबाजूची जमीन हादरली. दरम्यान, ही आग शॉर्ट सर्किटमुळं लागली की, इतर काही संशयास्पद हालचालींमुळं लागली, याचा तपास भिवाडी पोलीस करत आहेत. तसंच प्रशासनानं आता इतर औद्योगिक युनिट्सना त्यांच्या सुरक्षा मानकांचा तात्काळ आढावा घेण्याच्या कडक सूचना दिल्या आहेत.

## रोहित पवारांनी दिल्लीत खासगी गुप्तहेरांची भेट घेतली, दादांचा अपघात की घातपात

### लवकरच सत्य समोर आणणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नवी दिल्ली**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत घातपाताचा संशय व्यक्त करणारे शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे सध्या दिल्लीत राहून एक महत्त्वाचे काम पार पाडत आहेत. रोहित पवार यांनी काही दिवसांपूर्वीच पत्रकार परिषद घेऊन अजित पवार यांच्या विमान अपघातामागे काहीतरी काळंबेरं असल्याची शक्यता बोलून दाखवली होती. सरकारने या अपघाताची चौकशी लावण्यापलीकडे फार काही केले नव्हते. त्यामुळे आता रोहित पवार यांनी आपल्या काकांच्या विमान अपघातामागील खरे कारण शोधण्यासाठी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ते सध्या दिल्लीत हवाई क्षेत्रात वैमानिक व अन्य पदांवर राहिलेल्या अधिकाऱ्यांच्या




भेटीगाठी घेत आहेत.

अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणाचा अहवाल येण्यास वेळ लागू शकतो, असे अधिकाऱ्यांचे मत आहे. मात्र, हा अहवाल लवकरात लवकर मिळावा यासाठी रोहित पवार हे खासगी गुप्तहेरांची मदत घेत असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताचं सत्य लवकरात लवकर समोर आणण्यासाठी रोहित पवार यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

स्वर्गीय अजित दादांच्या दुर्दैवी अपघाताचा आज २० वा दिवस असून अद्यापही ऊ्रृ्र- कडून प्राथमिक चौकशी अहवाल आलेला नाही. तसेच सर्व नियमांचे उल्लंघन करत विमाने चालवणाऱ्या तडठ कंपनीविरोधात देखील काहीही कारवाई अद्यापर्यंत झालेली नाही. परिणामी शंका अधिक बळावत चालल्या आहेत. त्यामुळे ऊ्रृ्र- ने लवकरात लवकर प्राथमिक चौकशी अहवाल द्यावा तसेच तडठ वर योग्य ती कारवाई करावी, अशी पोस्ट रोहित पवार यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहे.

अजित पवार २८ जानेवारीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी बारामती येथे येत असताना त्यांच्या विमानाचा अपघात झाला होता. बारामती विमानतळाच्या धावपट्टीवर उतरताना त्यांचे विमान कोसळले होते. अजित पवार यांच्या चार्टर्ड विमानाने सकाळी ८ वाजून १० मिनिटांनी मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन उड्डाण केले होते. हे विमान साधारण ८.४५ च्या सुमारास बारामतीच्या आसपास पोहोचले. हे विमान बारामती विमानतळाच्या रनवेवर उतरण्यापूर्वी बाजूच्या शेतात जाऊन कोसळले. खाली कोसळल्यानंतर या विमानाचा स्फोट झाला होता. यामध्ये अजित पवार यांच्यासह विमानातील पाच जणांचा जागीच मृत्यू झाला होता. सध्या या विमान दुर्घटनेची संबंधित यंत्रणांकडून चौकशी सुरु आहे. मात्र, या सगळ्यातून अद्याप कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत निर्माण झालेले संशयाचे धुके अद्याप दूर झालेले नाही.

## राज्य सरकारने थकीत शेतकरी कर्जदारांचा डेटा मागवला आगामी अर्थसंकल्पात कर्जमाफीबाबत मोठी घोषणा शक्य

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. राज्य सरकारकडून राज्यातील सर्व बँकांना थकीत कर्जदार शेतकऱ्यांची सविस्तर माहिती शासनाच्या शिंदे समितीकडे पाठवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठी काही सकारात्मक घोषणा होऊ शकतात, अशी चर्चा रंगू लागली आहे. विशेषतः थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या हालचालींमुळे आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.



जून २०२५ पर्यंत थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे काम विविध जिल्हा बँकांमार्फत सुरू आहे. नाशिक जिल्हा बँकेनेही या प्रक्रियेत पुढाकार घेतला असून सुमारे ७४ हजार शेतकऱ्यांची माहिती राज्य सरकारच्या अधिकृत पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. यामुळे संपूर्ण राज्यातील थकीत कर्जदारांचा अचूक आकडा शासनासमोर येणार आहे.


राज्य शासनाच्या मदतीसाठी एक समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीकडून ३० जून २०२५ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीतील थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती मागवण्यात आली आहे. जिल्ह्यातील सेवा सहकारी सोसायट्या, त्यांचे सचिव, बँकेचे तपास अधिकारी आणि शाखाधिकारी यांच्या माध्यमातून माहिती संकलन सुरू आहे. तसेच सहनिबंधक आणि निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांचेही सहकार्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रक्रियेचा उद्देश म्हणजे राज्यातील खऱ्या अर्थाने थकीत असलेल्या शेतकऱ्यांची स्पष्ट यादी तयार करणे हा आहे. शासनाच्या पोर्टलवर माहिती अपलोड झाल्यानंतर पुढील निर्णय घेणे सोपे जाणार आहे. कर्जमाफीचा निर्णय घ्यायचा झाल्यास अचूक आकडेवारी महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रशासनातील सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे बँकांकडून माहिती संकलन आणि पडताळणी या दोन्ही गोष्टींना प्राधान्य दिले जात आहे.

## 'शिवरायांचा काँग्रेसकडून अवमान होत असताना उद्धव ठाकरे गप्प का?' भाजपाचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांची तुलना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानशी करणे अत्यंत संतापजनक आहे. कोणत्याही फुटकळ कारणासाठी पत्रकार परिषदा घेऊन भाजपावर टीका करणारे, फेसबुक लाइव्ह करणारे उद्धव ठाकरे तीन दिवस उलटले तरी याप्रकरणी मूग गिळून गप्प बसले आहेत. काँग्रेसच्या पाठिंब्याशिवाय पुन्हा आमदार होण्याचे स्वप्न साकार होणार नाही, हे लक्षात आल्यानेच उद्धव ठाकरे गप्प आहेत का? छत्रपतींचा अवमान होत असताना उद्धव ठाकरे यांनी निषेध का केला नाही, असा सवाल भाजपाचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी विचारला. उद्धव ठाकरेंमध्ये स्वाभिमान, थोडी जरी धमक शिल्लक असेल तर उद्धवसेनेने हर्षवर्धन सपकाळांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन करावे, असे आव्हान बन यांनी दिले.




टिपू सुलतानवरून भाजपावर टीका करणा-या राऊतांना खडे बोल सुनावताना नवनाथ बन म्हणाले की, भाजपाचे धोरण स्पष्ट आहे. जो या देशातल्या हिंदूंवर अत्याचार करतो, हिंदू मंदिरांची तोडफोड करतो, हिंदू आया बहिणींवर ज्याने बलात्कार केले, त्या टिपू सुलतानचे समर्थन भाजपा कधीच करणार नाही. महाविकास आघाडीचे सरकार असताना मालवणीमध्ये पालकमंत्री अस्लम शेख यांनी एका उद्यानाला टिपू सुलतानचे नाव देण्याचा प्रयत्न केला होता. त्याची आठवण करून देत बन म्हणाले की, त्यावेळी या विरोधात भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. भाजपा नेते मंगल प्रभात लोढा, गोपाळ शेट्टी, अतुल भातखळकर, तेजिंदर तिवाना यांनी प्रखर विरोध केला होता. भाजपा कार्यकर्त्यांनी लाठ्या काठ्या खाल्ल्या पण त्या मैदानाला टिपू सुलतानचे नाव देऊ दिल नाही. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी आंदोलन करणाऱ्या भाजपाच्या कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्याचे हीन काम केलं होतं, अशी टीका बन यांनी सोडले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान होत असताना संजय राऊत त्याचा संबंध निवडणुकांशी जोडायचा घाणेरडा प्रयत्न करत आहेत, राजकारण करत आहेत. भाजपासाठी शिवरायांचा अपमान हा निवडणुकीचा विषय नाही, अस्मितेचा विषय आहे. निवडणूक पाहून आंदोलन करणे भाजपाच्या तत्वात बसत नाही. शेवटच्या श्वासापर्यंत शिवरायांचा सन्मान राखू, असेही म्हणाले.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान भाजपा कदापि सहन करणार नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महाराष्ट्राची माफी मागावी अन्यथा आंदोलन अटळ आहे, असा इशाराही नवनाथ बन यांनी दिल

## 'त्या' ३ दिवसांत ७५ फाईलींना मंजुरी; अजितदादांच्या निधनानंतर काही तासांत घडला खळबळजनक प्रकार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर काही तासांत मंत्रालयात प्रचंड वेगाने फाईल्स फिरल्या. त्यात जवळपास २० संस्थांच्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. अल्पसंख्याक विकास विभागाकडून शाळांना अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र देण्याचे काम होते. तिथे अजित पवारांच्या निधनाच्या दिवशी आणि त्यानंतर काही तासांमध्ये मंत्रालयातील अधिकाऱ्यांनी हा कारनामा केला आहे. विशेष म्हणजे १२ ऑक्टोबर २०२५ रोजी माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी प्रमाणपत्र वाटपाला स्थगिती दिली होती. त्यानंतर कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर हा विभाग अजितदादांकडे होता.

याबाबत प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस अक्षय जैन यांनी म्हटलं की, २८ डिसेंबरला ज्यादिवशी अजित पवारांचे निधन झाले. त्यानंतर अचानक राज्यातील २० संस्थांच्या ७५ शाळांना २८ ते ३० डिसेंबर या कालावधीत संध्याकाळी ६.३० वाजता, ७ वाजता, ८ वाजता अधिकाऱ्यांनी तातडीने प्रमाणपत्र वाटपाचा निर्णय घेण्यात आला. ३ महिन्यापूर्वी या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. त्यानंतर या खात्याच्या मंत्र्यांचे निधन झालेले असताना अधिकाऱ्यांनी ही घाई का केली, हा संवेदनशील विषय असता अधिकाऱ्यांनी निर्लज्जपणा केला असा आरोप त्यांनी केला.

एखाद्या शाळेला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यानंतर त्यांना शिक्षक भरतीत ढएढ लागू होत नाही. या शाळांवर ठढए कायदा लागू होत नाही. माणिकराव कोकाटे यांनी १२ ऑक्टोबरला आदेश दिले होते. या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. मात्र असंवेदनशील अधिकाऱ्यांनी अजितदादांच्या निधनानंतर लगेच ही प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आम्ही हा प्रकार उघडकीस आणला आहे. या निर्णयामागे आर्थिक हितसंबंध आहेत. एकटा अधिकारी हे करू शकत नाही. यामागे संपूर्ण नेटवर्क असेल. या अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे अशी मागणी अक्षय जैन यांनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे केली.

**अजितदादांच्या निधनानंतर मंत्रालयात काय घडलं?**

अजित पवारांचं विमान अपघाती निधन झाल्यानंतर त्याचदिवशी मंत्रालयात ३ वाजून ९ मिनिटांनी पहिले प्रमाणपत्र जारी करण्यात आले. ज्या ७५ शाळांना अल्पसंख्याक दर्जा दिला त्यात २५ पोदार इंटरनॅशनलच्या शाळांचा समावेश आहे. अजित पवारांच्या निधनादिवशीच ६ शाळांना प्रमाणपत्र जारी करण्यात आले. राज्यात दुखवटा असताना आणि विशेष म्हणजे या खात्याच्या मंत्र्यांचे निधन झाले असतानाही अधिकाऱ्यांनी या शिक्षण संस्थांना अल्पसंख्याक दर्जा दिला.

या प्रकरणाची माहिती समोर येताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ दखल घेतली. संबंधित ७५ शाळांना देण्यात आलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्रांना स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असेही निर्देश देण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे.

**अल्पसंख्याक आयोगानेही घेतला आक्षेप**


घाईघाईने शाळांना अल्पसंख्याक दर्जा देण्याची ही घटना चुकीची आहे. या प्रकरणाचा तपास व्हायला हवा. अल्पसंख्याक शाळांमध्ये आपल्याच कुटुंबातील लोकांना नोकरी देऊन सरकारचा पैसा खाल्ला जातो. याबाबत मागे आम्ही तक्रार केली होती. जेवढ्या अल्पसंख्याक दर्जाच्या शाळा आहेत तिथे फक्त व्यापार चालतो, विद्यार्थ्यांना शिकवले जात नाही. त्यामुळे मंत्रालयातील या प्रकाराचा तपास करून जो कुणी यात दोषी आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील असा इशारा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिला आहे. त्याशिवाय या प्रकाराची दखल घेऊन मुख्यमंत्र्यांनी तातडीने पाऊले उचलावीत अशी मागणीही त्यांनी केली.

## मेळघाट मधील यात्रेत चक्क बोकडांची शर्यत, पहिल्यांदाच रंगला 'बोकडपट'

### दहेंडा यात्रेत प्रथमच आयोजित 'बोकडपट' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मेळघाट**

अमरावती जिल्ह्यात अनेक ठिकाणी बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात येते. त्याला विदर्भात 'शंकरपट' या नावाने ओळखले जाते. महाशिवरात्रीच्या निमित्ताने शिवालयानजीक यात्रोत्सव असतो. मोर्शी तालुक्यातील सालबर्डीची यात्रा प्रसिद्धच. पण मेळघाटातील धारणी तालुक्यातील दहेंडा या गावात यावेळी महाशिवरात्रीनिमित्त प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या बोकडांच्या शर्यतीने यात्रेकरूंचे लक्ष वेधून घेतले.



दहेंडा हे एक छोटेसे गाव. गावाजवळ एक तलाव. सभोवताली टेकड्या आणि एका टेकडीवर उंच जागी महादेवाचे मंदिर निसर्गरम्य अशा या परिसरात महाशिवरात्रीच्या निमित्ताने यात्रा भरते. यात्राही छोटीशीच. पंचक्रोशीतील गावांमधून लोक या ठिकाणी महादेव मंदिरात दर्शनासाठी येतात आणि यात्रेत रमून जातात. लहान मुलांचा ओसंडून वाहणारा उत्साह यात्रेकरून यावेळी मात्र वेगळाच अनुभव आला.

लहान छकड्यांना बोकडांना जुंपल्याचे त्यांना दिसले. कुतूहल म्हणून लोक या ठिकाणी जमले. लहान छकड्यांना हाकणारी लहान मुले आणि त्यांना प्रोत्साहन देणारे आयोजक. शिट्टी वाजताच बोकडांची ही शर्यत सुरू झाली. अंतरही कमीच. लहान छकड्यांवर उभे राहून बोकडांना हाकणारे चिमुकले धूरकरी आणि त्यांनीच तयार केलेले छकडे हे आकर्षण ठरले. प्रेक्षकानीही टाळ्या वाजवून या चिमुकल्यांचा उत्साह वाढवला.महाशिवरात्रीनिमित्त काही आगळेवेगळे करण्याचा आयोजकांचा विचार होता. बैलगाडा शर्यत म्हणजे मोठी तयारी, नियोजन आवश्यक असते. मेळघाटात लहान मुले बोकडांना छकडे बांधून एकएकटे खेळत असतात. बेलांच्या शर्यतीवर असलेल्या मर्यादा पाहून स्थानिक तरूणांनी 'बोकडपट' आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तरूणांचा उत्साह पाहून गावकऱ्यांनीही त्यांना प्रोत्साहन दिले.

दहेंडा येथील या रोमांचक बोकडपटात मेळघाटातील अनेक गावांतून बोकड सहभागी झाले होते. अतिशय अटीतटीच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक खाऱ्या-टेंभू येथील बोकडांनी आपल्या चपळाईने पटकावला बोबदो येथील बोकड्यांनी आपली ताकद दाखवत दूसरे स्थानक पटकावलेबोकडपट' आयोजित करण्याचा निर्णय घेतला. तरूणांचा उत्साह पाहून गावकऱ्यांनीही त्यांना प्रोत्साहन दिले.

दहेंडा येथील या रोमांचक बोकडपटात मेळघाटातील अनेक गावांतून बोकड सहभागी झाले होते.

अतिशय अटीतटीच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक खाऱ्या-टेंभू येथील बोकडांनी आपल्या चपळाईने पटकावला. बोबदो येथील बोकड्यांनी आपली ताकद दाखवत दुसरे स्थानक पटकावले, विजेच्या संघांच्या मालकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.परंपरेला नवा आयाम मेळघाटात व्हॉलिबॉलची स्पर्धा मोठ्या प्रमाणात घेतली जाते. आदिवासी युवकांना त्याचे वेड आहे. पण, यंदाचा हा बोकडपट खरोखरच कौतुकास्पद ठरला. यामुळे यात्रेला एक वेगळेच वलय मिळाले आहे. पारंपरिक खेळांना अशा रीतीने मनोरंजक स्वरूप दिल्यामुळे या बोकडपटाची चर्चा आता संपूर्ण अमरावती जिल्ह्यात रंगली आहे. आदिवासी मुलांनी या बोकडपटासाठी छकडे तयार केले. या संपूर्ण स्पर्धेत ते छकडेसुद्धा बोकडप्रमाणे चर्चेत राहिले, हे विशेष. अशा प्रकारची बोकडांची शर्यत पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली होती.

## टिपू सुलतानांचे वंशज भाजपमध्ये गेल्यास त्यांनाही पदे दिली जातील : हर्षवर्धन सपकाळांचा पलटवार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपवर तीव्र टीका करत भाजपला संविधान बदलायचे आहे, असा गंभीर आरोप केला आहे. सोमवारी बुलढाणा येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी विविध मुद्द्यांवर भूमिका स्पष्ट केली. विशेषतः भाजप आणि टिपू सुलतान यांच्याभोवती सुरू असलेल्या वादावर त्यांनी भाष्य केले. भाजप संविधानातील महापुरुषांविषयी कायम आक्षेप घेत असल्याचा आरोप करत, टिपू सुलतानाबाबतही भाजपचे धोरण तस्सेच असल्याचे त्यांनी म्हटले.

सपकाळ यांनी सांगितले की, भाजप नेते देवेंद्र फडणवीस हे टिपू सुलतानांविरोधात सातत्याने बोलतात. मात्र राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकांदरम्यान काही ठिकाणी फडणवीस आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सभांमध्ये स्टेजच्या पार्श्वभूमीवर टिपू सुलतानाचे चित्र लावलेले दिसले, असा दावा त्यांनी केला. राजकीय सोयीनुसार भूमिका बदलण्याचे हे उदाहरण आहे, असे ते म्हणाले. पुढे ते म्हणाले की, उद्या टिपू सुलतानांचे वंशज भाजपमध्ये दाखल झाले तर त्यांनाही मोठी पदे दिली जातील, अशी टीकाही त्यांनी केली.

सहा सोनेरी पाने, या पुस्तकाचा उल्लेख करत सपकाळ यांनी स्वा. सावरकर यांच्या लिखाणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल चुकीचे लिहिलेले असल्याचा आरोप त्यांनी केला. शिवाजी महाराजांच्या सज्जनपणाला विकृती म्हणण्याचे धाडस करण्यात आले आहे. स्वराज्य स्थापन होणारच होते; पण कावळा बसायला आणि डांग तुटायला जसे होते, तसे शिवाजी महाराज आले, असा उल्लेख त्या पुस्तकात आहे, असे ते म्हणाले. अशा विचारांना भाजप मान्यता देते, असा आरोपही त्यांनी केला. गोंधळ निर्माण करणे हे भाजपचे धोरण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संपादकीय ......

# बांगला देशचा नवा नायक

बांगला देशच्या राजकारणावर ३० वर्षे वर्चस्व राखलेल्या शेख हसीना आणि खालिदा झिया या दोन नेत्यांविना झालेल्या यंदाच्या सार्वत्रिक निवडणुकीत बांगला देश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) या पक्षाने मोठा विजय मिळवला. त्यामुळे आता तरी या शेजारी देशातील परिस्थिती सुरळीत होईल, अशी अपेक्षा आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार उलथवण्यात आले. त्यामुळे हसीना यांना परागंदा होऊन भारताच्या आश्रयास यावे लागले. त्यास दीड वर्ष उलटले. तेव्हापासून तेथे मोहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखालील हंगामी सरकारच काम पाहत होते. आता जमाते इस्लामी या धर्मवादी पक्षाला नाकारताना बांगला देशी जनतेने बीएनपीच्या सुधारणावादी धोरणांच्या बाजूने मतदान केले असून, या पक्षाचे मुख्य नेते तारिक रहमान हे नवे पंतप्रधान होणार आहेत. दोनच वर्षांपूर्वी म्हणजे २०२४ मध्ये तेथे झालेली संसदेची निवडणूक ही विरोधी पक्षांनी टाकलेल्या बहिष्कारामुळे निरर्थकच ठरली. त्यामुळे हसीना सरकारला खर्याअर्थाने वैधता प्राप्त झालेलीच नव्हती. गेल्या काही वर्षांत त्यांच्या हुकूमशाहीवादी धोरणांचा अतिरेक झाला. विरोधातील आंदोलनात त्यांची राजवट कोसळली आणि अवामी लीग या हसीना यांच्या पक्षाची मान्यताही रद्द झाली. त्यामुळे या निवडणुकीत अवामी लीगला भाग घेता आला नाही.

३०० सदस्यांच्या संसदेत बीएनपीने २०९ जागा पटकावल्या. बांगाला देशी लोकांनी शेख हसीना यांचे सरकार पाडणार्या 'नॅशनल सिटिझन्स पार्टी'ला साफ नाकारले. जमाते इस्लामी या पक्षास ६८ जागांवर विजय मिळाला. बीएनपी हा भारताचा पारंपरिक मित्रपक्ष नाही. गेल्यावर्षी ३० डिसेंबर रोजी खालिदा झिया यांचा मृत्यू झाला. बांगला देशच्या स्वातंत्र्य आंदोलनात शेख हसीना यांचे वडील वंगबंधू शेख मुजिबूर रहमान यांचेच नेतृत्व होते. खालिदा झिया यांचाही स्वातंत्र्य आंदोलनाशी संबंध होता. त्यांचे पती झिया उर रहमान पाक लष्करात उठाव करून स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाले होते. मुजिबूर रहमान आणि बीएनपीचे संस्थापक झिया उर रहमान या दोघांनीही बंगाली भाषा आणि संस्कृतीला महत्त्व दिले. अवामी लीग हा बंगाली राष्ट्रवादाचा पुरस्कर्ता पक्ष असला, तरी त्यात धर्मनिरपेक्षता, वंगभाषा आणि अस्मिता यांना महत्त्व आहे. बीएनपी हा पक्ष बांगला देशी राष्ट्रवादाला प्राधान्य देतानाच इस्लामी मूल्ये आणि सार्वभौमत्वाला महत्त्व देतो.

उलट जमाते इस्लामीने बांगला देश स्वातंत्र्य आंदोलनास विरोध करून, पाकिस्तानची बाजू घेतली होती. पाक लष्कराने जेव्हा पूर्व पाकिस्तानात नरसंहार आरंभला तेव्हा त्यास 'जमात'ने मदतच केली होती. शेख हसीना यांनी या पाकिस्तानवादी धर्मांध 'जमात'च्या काही नेत्यांना न्यायालयीन प्रक्रियेद्वारे फाशी दिली. मोहम्मद युनूस यांचे सरकारही पाकिस्तानवादीच होते. २०१२ नंतर पाकच्या परराष्ट्रमंत्र्यांनी युनूस यांच्या काळातच बांगला देशला भेट दिली होती. आता तारिक रहमान यांनी 'बांगला देश फर्स्ट' अशी घोषणा देत जाहीरनामा मांडला आहे. प्रशासन आणि न्यायव्यवस्थेत सुधारणा, लोककल्याणासाठी कुटुंब कार्ड व शेतकरी कार्ड, उत्पादन आधारित अर्थव्यवस्थेस चालना, कौशल्यविकास, जागतिक ई-कॉमर्स जोडणी, परकीय गुंतवणुकीला उत्तेजन आणि शासकीय खर्चात पारदर्शकता अशी अनेक आश्वासने त्यांनी दिली आहेत. तारिक हे माजी राष्ट्रपती झिया उर रहमान आणि माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे पुत्र आहेत. बीएनपीच्या यशाचे संपूर्ण श्रेय त्यांच्याकडेच जाते. २००८ मध्ये त्यांना देश सोडून पळावे लागले होते. १७ वर्षे निर्वासित राहिल्यानंतर २५ डिसेंबर २०२५ रोजी ते लंडनहून बांगला देशला परतले. हसीना सरकारने त्यांच्या विरुद्ध ८० खटले दाखल केले होते. तारिक यांना जन्मठेपेची शिक्षाही सुनावली होती; मात्र मायदेशात परतल्यानंतर त्यांचे एखाद्या नायकासारखे स्वागत झाले. देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्याचा एक रोडमॅपच त्यांनी सादर केला आहे.

खालिदा झिया यांच्या निधनामुळे निर्माण झालेली सहानुभूती, अवामी लीगची अनुपस्थिती, 'जमात'बद्दलचा राग आणि विद्यार्थी नेत्यांबद्दलची जनतेची निराशा या सर्व गोष्टी 'बीएनपी'ला अनुकूल ठरल्या. 'आम्ही मैत्री करू, गुलामी नाही' असे तारिक यांनी परराष्ट्र धोरणाबाबत म्हटले आहे. याचा अर्थ, भारत, पाकिस्तान अथवा चीन, कोणीही असो, आम्ही सर्वांशी सलोख्याचे संबध ठेवू; पण कोणाचेही प्यादे बनणार नाही, अशी त्यांची भूमिका आहे. शेख हसीना यांच्या काळात भारत-बांगला देश संबंध अत्यंत चांगले होते, तरीही त्या भारताच्या दबावाखाली होत्या, अशी त्यांची प्रतिमा निर्माण केली गेली. हसीना यांना भारतात आश्रय देणे आणि त्यानंतर बांगला देशवर व्हिसा व व्यापारी निर्बंध लादणे, यामुळे उभय देशांतील संबंध अलीकडच्या काळात बिघडले; परंतु परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी बांगला देशात जाऊन तारिक यांची भेट घेतली होती.

पंतप्रधान मोदींनीही त्यांच्याशी संवाद केला होता आणि आताच्या विजयाबद्दल तारिक यांचे अभिनंदन केले आहे. हसीना सरकार असताना 'बीएनपी'च्या नेत्यांचा छळ सुरू होता. आता तारिक हे त्याचा बदला घेतात की अवामी लीगलाही राजकीय प्रक्रियेत सामावून घेतात, हे पाहावे लागेल. ढाका मतदारसंघातून गयेश्वरचंद्र रॉय या हिंदू नेत्याने विजय मिळवला आहे. बांगला देश भारतातून कापूस व सुताची मोठी खरेदी करतो. या आयातीवर शुल्क माफी असून, ती उठवून कर लादावे, अशी भूमिका 'बीएनपी'ने मांडली होती. ते प्रत्यक्षात झाल्यास भारतीय वस्त्रोद्योगास फटका बसेल यात शंका नाही. शेख हसीना यांच्या प्रत्यार्पणाची मागणीदेखील तारिक यांनी वारंवार केली आहे. या मुद्द्यावरून उभय देशांचे संबंध बिघडू नयेत, याची दक्षता मात्र भारत सरकारला घ्यावी लागणार आहे. हे सत्तांतर या देशासाठी महत्त्वाचे आहेच, त्याहून अधिक भारतासाठी. कारण, तेथील हिंदूंवरील अत्याचार वाढत असताना आणि त्या कारणाने उभय देशांतील संबंध ताणले असताना नव्या पंतप्रधानांच्या भूमिकेकडे देशाचे लक्ष आहे.

# डाळिंबावरील बुरशीजन्य स्कॅब, काळे ठिपके आणि फळ कुजवा नियंत्रणासाठी 'या' फवारण्या करा




दि.१६ विदर्भ प्रजासत्ताक कृषी

डाळिंबावरील बुरशीजन्य स्कॅब , काळे ठिपके आणि फळ कुजवा हे रोग प्रामुख्याने दमट हवामान आणि पावसाळ्यात उद्भवतात. या रोगांची लक्षणे काय आहेत, त्यावर उपाय काय करावा, हे समजून घेऊयात...

डाळिंब पिकावर बुरशीजन्य स्कॅब, ठिपके आणि कुजवा यांसाठी काही आशादायक बुरशीनाशके जसे मॅण्डीप्रोपामीड, मेटीराम, प्रोपिकोनॅझोल, ॲझोक्सिस्ट्रॉबीन, झोक्सिस्ट्रॉबिन + डायफेनोकोनॅझोल, क्लोरथैलोनिल मेटॅलॅक्झिल एम, बोर्डो मिश्रण ०.५ टक्के, कासुगामायसीन कॉपर ऑक्सिक्लोराइड, झायनेब हेक्झाकोनॅझोल, ट्रायसायक्लॅझोल + मॅन्कोझेब, क्लोरोथैलोनिल, फ्लूओपायरम + टेब्यूकोनॅझोल, टेब्यूकोनॅझोल ट्रायफ्लॉक्सीस्ट्रोबीन वरीलपैकी कोणत्याही बुरशीनाशकाच्या दोन ते तीन फवारण्या १० ते १४ दिवसांच्या अंतराने केल्यास चांगले परिणाम दिसून येतात. त्यामुळे पुढील अनेक फवारण्या टाळता येतात. बोर्डो मिश्रणाव्यतिरिक्त प्रत्येक फवारणीत स्टीकर स्प्रेडर वापरावा. एका हंगामात कॉपरयुक्त बुरशीनाशकाव्यतिरिक्त कोणतेही बुरशीनाशक दोनपेक्षा जास्त वेळा फवारू नये. (वरील बुरशीनाशकाची फवारणी आपल्या जवळील संशोधन केंद्र / कृषी विज्ञान केंद्रातील तज्ज्ञ यांचा सल्ला घेऊनच करावे.)

# कोलंबोत टीम इंडियाचा 'रुद्राभिषेक'

## महाशिवरात्रीला पाकिस्तान विरुद्ध विजयाचा महातांडव

### भारताचा पाकिस्तानचा ६१ धावांनी उडवला धुव्वा, सुपर ८ फेरीत दिमाखात धडक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१६कोलंबो

आर. प्रेमदासा स्टेडियमवर क्रिकेटचा रणसंग्राम नव्हे, तर भारतीय गोलंदाजीचा 'रुद्रावतार' पाहायला मिळाला. महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर भारतीय संघाने आठव्यांदा वर्चस्व गाजवत पाकिस्तानचा ६१ धावांनी धुव्वा उडवला. पाक संघाची फलंदाजी पत्त्यासारखी कोसळली. इशान किशनची वादळी फलंदाजी आणि त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी फिरवलेल्या 'चक्रव्यूहात' अडकून पाकिस्तानचा ११४ धावांत खुर्दा झाला.

**इशानचा 'झंझावात' आणि सूर्याचे 'तेज'**

प्रथम फलंदाजी करताना भारताची सुरुवात अडखळत झाली. पहिल्याच षटकात अभिषेक शर्मा शून्यावर बाद झाला खरा, पण त्यानंतर मैदानात आलेला इशान किशन पाकिस्तानी गोलंदाजांसाठी 'काळ' ठरला. त्याने ४० चेंडूंत ७७ धावांची (१० चौकार, ३ षटकार) स्फोटक खेळी करत पाकिस्तानचा 'पॉवरप्ले'च हिरावून घेतला.



कर्णधार सूर्यकुमार यादवने (३२) आणि शेवटच्या षटकात शिवम दुबे (२७) व रिंकू सिंहने केलेल्या फटकेबाजीमुळे भारताने १७५ धावांचे डोंगरासारखे आव्हान उभे केले.

**पाकिस्तानी फलंदाजीचे लोटांगण**

१७६ धावांचा पाठलाग करायला उतरलेल्या पाकिस्तानला पहिल्याच षटकात हार्दिक पंड्याने साहिबजादा फरहानला शून्यावर बाद करून पहिला झटका दिला. त्यानंतर आला जगाचा तारणहार जसप्रीत बुमराह! त्याने सईम अयुब आणि कर्णधार सलमान आघाला आपल्या 'ब्रह्मास्त्रा'ने गारद केले. पाकिस्तानची अवस्था २ षटकांत ३ बाद १३ अशी दयनीय झाली होती.

**स्पिनर्सचे 'मायाजाल': अक्षर आणि वरुणचा तडाखा**

वेगवान गोलंदाजांनी कंबरडे मोडल्यानंतर फिरकीच्या जाळ्यात पाकिस्तानला अडकवण्याचे काम अक्षर पटेलने केले. त्याने सेट झालेल्या उस्मान खानला (४४) आणि दिग्गज बाबर आझमला (५) तंबूत धाडून पाकिस्तानच्या उरल्यासुरल्या आशा धुळीस मिळवल्या. वरुण चक्रवर्तीने आपल्या 'मिस्ट्री'चा असा काही प्रभाव पाडला की, त्याने सलग दोन चेंडूंत दोन बळी घेत पाकिस्तानला शरणागती पत्करायला लावली. कुलदीप यादव आणि तिलक वर्मानेही प्रत्येकी एक बळी घेत विजयाची औपचारिकता पूर्ण केली.

**टी-२० विश्वचषकात टीम इंडियाचीच 'हुकूमत' कायम**

टी-२० विश्वचषकाच्या रणांगणात भारतीय संघाचा दबदबा आजही अबाधित आहे. भारत आणि पाकिस्तान या पारंपरिक प्रतिस्पर्ध्यांमध्ये आतापर्यंत विश्वचषकाच्या इतिहासात एकूण ९ सामने खेळले गेले आहेत. या ९ लढतींपैकी तब्बल ८ वेळा टीम इंडियाने पाकिस्तानला धूळ चारत विजयश्री खेचून आणली आहे, तर पाकिस्तानला केवळ एकाच सामन्यात विजय मिळवता आला आहे.आजच्या या दिमाखदार विजयामुळे भारताने या फॉरमॅटमध्ये पाकिस्तानविरुद्धचे आपले वर्चस्व केवळ सिद्धच केले नाही, तर ते अधिक भक्कम केले आहे. विश्वचषकाच्या व्यासपीठावर भारताला रोखणे पाकिस्तानसाठी पुन्हा एकदा 'अशक्य' असल्याचेच या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

# महानगरपालिकेच्या १३ शहरी आरोग्य केंद्रांचे 'गुणवत्ता व कायाकल्प' अंतर्गत मूल्यमापन

## अकोला आरोग्य विभागाची तपासणी मोहीम; रुग्णांना उच्चतम सुविधा देण्यावर भर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१६अमरावती



अमरावती महानगरपालिका अंतर्गत कार्यरत असलेल्या १३ शहरी आरोग्य केंद्रे व त्याअंतर्गत २९ आरोग्य वर्धनी केंद्रांचे 'गुणवत्ता व कायाकल्प' कार्यक्रमांतर्गत मूल्यमापन करण्यात आले. नागरिकांना दर्जेदार व सर्वसमावेशक आरोग्य सेवा मिळावी या उद्देशाने ही तपासणी मोहीम राबविण्यात आली.महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे व आरोग्य अधिकारी डॉ. विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य केंद्रे सुसज्ज ठेवणे, नियमित लसीकरण, गर्भवती महिलांची तपासणी व उपचार, स्वच्छ पिण्याचे पाणी, प्रतीक्षालय, बाह्यरुग्ण कक्ष, महिला रुग्णांसाठी महिला डॉक्टरांची उपलब्धता तसेच विविध योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे यावर विशेष भर देण्यात आला आहे.या मूल्यमापनासाठी अकोला जिल्हा आरोग्य विभाग तर्फे जिल्हा आरसीएच अधिकारी डॉ. विनोद करंजीकर व जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनीष शर्मा यांनी अमरावती दौरा केला. त्यांच्या सोबत मनपाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आरसीएच अधिकारी डॉ. स्वाती कोवे, शहर गुणवत्ता आश्वासन अधिकारी डॉ. वंदना गुढे, साथरोग अधिकारी डॉ. रुपेश खडसे व सारिका पाटील यांच्या समितीने सर्व १३ आरोग्य केंद्रांची पाहणी केली.हैदरपुरा, भाजीबाजार, आयसोलेशन, पठाण चौक, मसाणगंज, महेंद्र कॉलनी, विलासनगर, संजीवनी, हमालपुरा, बडनेरा, जिल्हा सामान्य, दस्तूरनगर व वडाळी येथील केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत तपासणी करण्यात आली. या दरम्यान रुग्णांना देण्यात येणाऱ्या उपचारांची पद्धत, डॉक्टरांची उपलब्धता, तपासणी वेळा, लसीकरण वेळापत्रक, गोल्डन कार्ड, आयुष्मान भारत व प्रधानमंत्री योजनांशी संबंधित दस्तऐवजांची पडताळणी करण्यात आली.तसेच कोल्ड चेनसाठी फ्रीजची स्थिती, बायोमेडिकल वेस्ट व्यवस्थापन, विद्युत पुरवठा, स्वच्छता, कर्मचाऱ्यांच्या व नागरिकांच्या अडचणी यांची सविस्तर माहिती घेण्यात आली. आरोग्य निरीक्षक व संबंधित कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने मूल्यमापन दौरा यशस्वीरीत्या पूर्ण झाला.समितीने सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांचे अभिनंदन करत राज्यस्तरावर अमरावतीचे आरोग्य केंद्र अग्रस्थानी राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

# दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांवर तात्काळ कार्यवाही; बोगस प्रमाणपत्रांवर कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१६ बुलढाणा

जिल्ह्यातील दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. बैठकीस सर्व विभाग प्रमुख तसेच महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.बैठकीत शासन निर्णयानुसार ४ टक्के आरक्षणाची प्रभावी अंमलबजावणी, पदोन्नतीतील आरक्षण, बदलीतील सवलती, प्रवास भत्ता, यूडीआयडी कार्ड, तांत्रिक सहाय्यक साधने, विशेष नैमित्तिक रजा आदी मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. सेवेत असताना दिव्यांगत्व आल्यास संरक्षणात्मक उपाययोजना करण्यावरही भर देण्यात आला.संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यात काही धडधाकट व्यक्तींनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांद्वारे शासकीय लाभ घेत असल्याचा गंभीर मुद्दा उपस्थित केला. यामुळे खऱ्या दिव्यांग कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याचे सांगत सखोल चौकशी व कठोर कारवाईची मागणी करण्यात आली.यावर जिल्हाधिकाऱ्यांनी दिव्यांग हक्क अधिनियम २०१६नुसार सर्व सवलतींची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. बोगस प्रमाणपत्र आढळल्यास तत्काळ चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना देत कोणतेही प्रकरण प्रलंबित ठेवू नये, असे स्पष्ट निर्देश दिले.




# बीट खाताना 'ही' चूक पडू शकते महागात!



दि.१६विदर्भ प्रजासत्ताक आरोग्य

शरीरातील रक्ताचे प्रमाण वाढवणे, रोगप्रतिकारशक्ती सुधारणे आणि वजन नियंत्रित ठेवण्यासाठी बीट खाण्याचा सल्ला दिला जातो. यामध्ये व्हिटॅमिन सी, ए, अँटिऑक्सिडंटस् आणि खनिजांचा मोठ्या प्रमाणावर समावेश असल्याने याला सुपरफूड म्हटले जाते. मात्र, कोणताही आरोग्यदायी पदार्थ खाण्याची पद्धत चुकली तर ती शरीरासाठी घातक ठरू शकते. अनेकजण बीट कच्चे खातात किंवा त्याचा रस पितात. परंतु, ही पद्धत चुकीची ठरू शकते. बीट ही मुळाची भाजी असल्याने त्यात जमिनीतील मातीतून येणारे बॅक्टेरिया, पेस्टिसाईडस् आणि हेवी मेटल्स असण्याची शक्यता असते. यामुळे पोटाचे विकार जडण्याची किंवा शरीरातील महत्त्वाच्या अवयवांना इजा पोहोचण्याची भीती असते. म्हणूनच, बीट नेहमी हलके शिजवून किंवा वाफवून खाणे अधिक सुरक्षित मानले जाते.

ज्यांना किडनी स्टोन म्हणजेच मूतखड्याचा त्रास आहे, त्यांनी बीट खाणे टाळावे. बीटमध्ये ऑक्सलेटस्चे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे किडनीमध्ये कॅल्शियम ऑक्सलेटस् स्टोन तयार होण्याचा धोका वाढतो. तुम्हाला मूत्रपिंडाशी संबंधित इतर काही समस्या असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बीटचे सेवन करू नका. ज्या व्यक्तींना 'आयबीएस' (इरिटेबल बॉवेल सिंड्रोम) किंवा 'आयबीडी' (इन्फ्लेमेटरी बॉवेल डिसीज) यांसारख्या आतड्यांच्या समस्या आहेत, त्यांनी कच्च्या बीटचे सेवन पूर्णपणे टाळावे. कच्चे बीट खाल्ल्याने पोटदुखी, गॅस, पोट फुगणे आणि पोटातील अस्वस्थता वाढू शकते. यामुळे आधीच असलेला आजार अधिक बळावण्याची शक्यता असते.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखणार; आता राज्यस्तरीय टास्क फोर्सची स्थापना, काय आहे नेमका उद्देश?




विदर्भ प्रजासत्ताक
दि.१६पुणे

राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी, तसेच हवामान बदलामुळे निर्माण होणाऱ्या आपत्तींच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मानसिक, सामाजिक व आर्थिक समस्यांवर प्रभावी उपाययोजना राबवली जाणार आहे.

यासाठी महाराष्ट्र शासनाने कृषी विभागांतर्गत राज्यस्तरीय टास्क फोर्सची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. टास्क फोर्समार्फत शेतकरी आत्महत्यांची आर्थिक, सामाजिक व मानसिक कारणमीमांसा, हवामान बदलांचे परिणाम, अल्पकालीन व दीर्घकालीन धोरणात्मक उपाय, तसेच एकात्मिक हस्तक्षेप मॉडेल विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखता येतील, अशी अपेक्षा आहे. या टास्क फोर्सचे अध्यक्ष विस्तार प्रशिक्षण संचालक रफिक नाईकवाडी संचालक आहेत.तसेच संचालक सुनील बोरकर, उदय देशमुख, सहसंचालक गणेश घोरपडे, जीवन बुंदे, नंदकिशोर नाईनवाड, सत्यजित शितोळे, सोनाली शिळकर हे शासकीय सदस्य आहेत.तर सृष्टी डोईजड या अशासकीय सदस्य व कृषी धोरणातील तज्ज्ञ संशोधक डॉ. विनायक हेगाणा यांची विशेष सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.राज्यस्तरीय टास्क फोर्सच्या स्थापनेमुळे शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी समन्वयित, वैज्ञानिक आणि मानवी दृष्टिकोनातून उपाययोजना राबविण्यास गती मिळणार आहे.

**टास्क फोर्सचा नेमका उद्देश काय?**

शेतकऱ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास आणि संशोधन, हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेऊन त्यावर उपाययोजना सुचविणे. शेतकरी आत्महत्या प्रतिबंधासाठी धोरणात्मक उपयोजना, शेतीचे तंत्रज्ञान, आर्थिक साहाय्य. सामाजिक आधार आणि मानसिक आरोग्यावर आधारित एकात्मिक पद्धती विकसित करणे. आपत्तीपूर्व तयारी, आपत्तीच्या काळातील तातडीच्या उपाययोजना आणि आपत्तीनंतरच्या पुनर्वसनासाठी विशेष कृती कार्यक्रमाची निर्मिती विभागीय आणि जिल्हास्तरावरील अंमलबजावणीसाठी कृती आराखडा तयार करणे, विविध शासकीय, निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधणे.

# ८५ कोटींच्या मनी लाँडरिंग प्रकरणात राजेंद्र लोढा यांना ईडीकडून अटक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.१६मुंबई

लोढा डेव्हलपर्स लिमिटेडचे माजी संचालक राजेंद्र लोढा यांना सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीने गुरुवारी ८५ कोटींच्या मनी लाँडरिंग प्रकरणात औपचारिकपणे अटक केली. त्यांना २० फेब्रुवारीपर्यंत ईडीची कोठडी सुनावण्यात आली आहे.

याआधी राजेंद्र लोढा यांना मुंबई पोलिसांनी फसवणूक आणि बनावट कागदपत्रे तयार केल्याबद्दल गुन्हा नोंदवला होता. कंपनीची जमीन बेकायदेशीरपणे विकल्यामुळे तसेच हस्तांतरणीय विकास हक्क अर्थात टीडीआरमध्ये घोटाळा केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. राजेंद्र लोढा यांना सप्टेंबरमध्ये मुंबई पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर त्यांना आतापर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.

राजेंद्र लोढा यांना कंपनीने जमीन खरेदी-विक्रीचे अधिकार दिले होते. पण या अधिकाराचात्यांनी गैरवापर केला. तसेच कंपनीचा निधी दुसरीकडे वळवला, असाही आरोप त्यांच्यावर आहे. बऱ्याच वर्षांपासून ते असे व्यवहार करत होते. मुंबई महानगरातील ठाणे, कल्याण, पनवेल या ठिकाणच्या जमिनींमध्येत्यांनी अनियमितता केल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. मुलगा साहील आणि जवळच्या सहकाऱ्यांच्या मदतीने राजेंद्र यांनी पैशांचा अपहार केल्याचेही या अधिकाऱ्यांनी सांगितले. राजेंद्र लोढा यांची ५९ कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. १६ फेब्रुवारी २०२६ शहर/ग्रामिण

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# पशुगणनेवर कोट्यवधींची उधळण, परिणाम शून्य

## वर्षभरानंतरही अधिकृत आकडेवारी न जाहीर; नियोजनावर प्रश्नचिन्ह



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

२१ वी पशुगणना पूर्ण होऊन एक वर्षाचा कालावधी लोटला, तरीही अमरावती जिल्ह्यासह राज्यातील पशुधनाची अधिकृत आकडेवारी अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. 'पंधरा दिवसांत अंतिम शिक्कामोर्तब' आणि 'महिनाभरात चित्र स्पष्ट होईल' अशी आश्वासने देणाऱ्या प्रशासनाकडून आजवर एकही अधिकृत आकडा समोर आलेला नाही. त्यामुळे पशुगणना करून नेमके काय साध्य झाले ? असा थेट सवाल उपस्थित होत आहे.

२५ नोव्हेंबर २०२४ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत शहर व ग्रामीण भागात मोठ्या गाजावाजात २१ वी पशुगणना राबविण्यात आली. २२५ प्रगणक, ५६ पर्यवेक्षक, ऑनलाईन ॲप, प्रशिक्षण, वेळ आणि शासकीय खर्च हे सर्व झाले.मात्र वर्षभर उलटूनही आकडेवारी गुलदस्त्यातच असल्याचे चित्र आहे. पशुगणनेसाठी जिल्ह्यात २२३ प्रगणक व ५६ पर्यवेक्षकांची नेमणूक केली होती.ही पशुगणना पहिल्यांदाच ऑनलाईन अर्थात ॲपद्वारे करण्यात आली. पशुगणनेमुळे जिल्ह्यातील पशुधनाची संख्या निर्धारित होऊन त्यानुसार राज्य शासनाला धोरण आखून योजनांची सुसूत्रता करता येणार आहे. यात १६ पशुधन जाती, कुक्कुट पक्षी यांची प्रजातीनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय माहिती गोळा संकलीत केली आहे. २० व्या पशुगणनेनुसार जिल्ह्यातील १६४४ गावांमध्ये पशुगणना करण्यात आली होती. त्यापैकी ८७ गावांमध्ये पशुसंख्या शून्य असल्याचे नोंदविण्यात आले होते. गाय वर्गीय, म्हैस वर्गीय असे एकूण ५ लाख ९४ हजार ५९४ इतके पशुधन आहे. याशिवाय मेंढी ८३ हजार २०० आणि शेळी ३,४०,६८१ आहेत.

ऑनलाईन प्रणाली असूनही विलंब का? यावेळी पहिल्यांदाच ऑनलाईन ॲपद्वारे पशुगणना करण्यात आली. त्यामुळे प्रक्रिया जलद होईल, चुका टळतील आणि वेळेत अहवाल मिळेल, असे सांगण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात डिजिटल प्रणाली असूनही आकडेवारी जाहीर करण्यात अपयश आले आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जबाबदारी कोणाची? :वर्षभर उलटूनही आकडेवारी जाहीर न होणे ही संबंधित विभाग व प्रशासनाची गंभीर उदासीनता मानली जात आहे. जर गणनेचा निष्कर्षच बाहेर येणार नसेल, तर ही गणना केवळ कागदी औपचारिकता होती का? की निधी खर्च करण्याचा सोयीस्कर मार्ग? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

**धोरणे कागदावरच, पशुपालक वाऱ्यावर**

पशुगणनेचा मुख्य उद्देश पशुधन क्षेत्रासाठी धोरण ठरविणे, योजना आखणे आणि पशुपालकांना लाभ देणे हा असतो. पण आकडेवारीच उपलब्ध नसेल तर योजना कशाच्या आधारावर आखल्या जातात, पशुधन वाढले की घटले, हे ठरवते तरी कोण, पशुपालकांसाठीच्या अनुदान, लसीकरण, चारा योजना कोणत्या माहितीवर आधारित आहेत ? असे अनेक प्रश्न अनुत्तरितच आहेत.

# अचलपूरला 'अपर जिल्हाधिकारी' कार्यालयास शासन मान्यता सहा तालुक्यांना दिलासा

## मुख्यालयाच्या फेऱ्या कमी होणार, मेळघाट विकासाला चालना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

प्रशासकीय कामकाजातील वाढता ताण कमी करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याच्या दृष्टीने राज्य मंत्रिमंडळाने अचलपूर येथे 'अपर जिल्हाधिकारी' पद निर्मितीस मान्यता दिली आहे. १० फेब्रुवारी रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील ११ नवीन अपर जिल्हाधिकारी पदांना मंजुरी देण्यात आली असून त्यात अचलपूरचा समावेश आहे. या निर्णयामुळे सहा तालुक्यांतील नागरिकांची अमरावती मुख्यालयाची वारी मोठ्या प्रमाणात टळणार आहे.जिल्हाधिकारी कार्यालयावरील वाढता कामाचा ताण आणि दूरवरच्या गावांतील नागरिकांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन सन २०२३ मध्ये जिल्हा प्रशासनाने अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी तसेच अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला होता. उच्चस्तरीय



समितीच्या शिफारशीनंतर या प्रस्तावाला अखेर मंत्रिमंडळात हिरवा कंदील मिळाला.

**सहा तालुक्यांचा समावेश**

नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत अचलपूर, चांदूरबाजार, दर्यापूर, अंजनगाव सुर्जी, धारणी आणि चिखलदरा हे तालुके राहणार आहेत. यामध्ये अचलपूर, दर्यापूर आणि धारणी या तीन महसूल उपविभागांतील कामकाज स्थानिक पातळीवर होणार असल्याने निर्णयप्रक्रिया गतिमान होण्याची अपेक्षा आहे.

**मेळघाट विकासाला बळ**

धारणी आणि चिखलदरा हे मेळघाटातील दुर्गम तालुके अचलपूर कार्यालयाशी जोडले गेल्याने कुपोषण, रस्ते, पुनर्वसन आणि महसुली प्रश्नांच्या सोडवणुकीत गती येणार आहे. स्थानिक स्तरावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची उपस्थिती प्रशासनाचे सनियंत्रण अधिक सक्षम करणार आहे.प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटाराजमीन अधिग्रहण, भूसंपादन, गौण खनिज, पुनर्वसन, गावठाण विस्तार, अतिक्रमण कारवाई तसेच विविध अपिलीय प्रकरणांसाठी नागरिकांना अमरावती येथे वारंवार जावे लागत होते. आता या सहा तालुक्यांचे काम अचलपूर येथेच होणार असल्याने वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होईल.

**प्रस्तावित कार्यालयाची रूपरेषा**

एकूण लोकसंख्या : ११,३०,९४२क्षेत्रफळ : ६६४९ चौ.कि.मी.तालुके : ६गावे : ९५४मुख्यालयापासून शेवटच्या गावाचे अंतर : १२८ कि.मी.दरम्यान, अमरावती तहसील अंतर्गत शहर व ग्रामीण विभागणी करून अपर तहसील कार्यालय स्थापन करण्याचा प्रस्ताव अद्याप प्रलंबित असून तो लवकर मार्गी लावावा, अशी मागणी होत आहे.अचलपूर येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची स्थापना ही प्रशासनाच्या विकेंद्रीकरणाच्या दिशेने उचललेले महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात असून, त्यामुळे नागरिकांना अधिक जवळून आणि जलद सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आर्थिक नियोजन कोलमडले; महापालिकेत इंधन संकटमहत्वाच्या विभागात नियोजन शून्य कारभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

शहरातील नागरी सुविधांची जबाबदारी सांभाळणाऱ्या अमरावती महानगरपालिका समोर आता पेट्रोल-डिझेल टंचाईचे संकट उभे ठाकले आहे. इंधन पुरवठादारांचे थकित देयक मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहिल्याने अनेक विभागांची वाहने ठप्प झाल्याची माहिती पुढे आली आहे. परिणामी स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व अभियांत्रिकी विभागांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे.महापालिकेच्या ताफ्यातील कचरा संकलन गाड्या, पाणी टँकर, फॉगिंग मशिन वाहने तसेच दुरुस्ती पथकांच्या गाड्यांना पुरेसे इंधन मिळत नसल्याने काही भागांत सेवा विस्कळीत झाल्याची नागरिकांची तक्रार आहे. थकीत बिलांची रक्कम मोठी झाल्याने पुरवठादारांनी उधारीवर इंधन देण्यास नकार दिल्याची चर्चा आहे.परिणामी विभागा-विभागांतएकमेकांवर जबाबदारी ढकलण्याचा प्रकार सुरू आहे.विशेष म्हणजे, ज्यांचे अधिकाऱ्यांशी जुने संबंध आहेत किंवा ज्यांची दुसरी टर्म आहे, अशा काही नगरसेवकांना स्वतःच्या पैशातून डिझेल टाकून काम करून घ्यावे लागत आहे. मग नव्याने निवडून आलेल्या नगरसेवकांनी नेमके काय करायचे, असा सवाल उपस्थित होत आहे.महापालिकेचे कामकाज आरोग्य विभाग, अग्निशमन विभाग, कार्यशाळा विभाग, अतिक्रमण विभाग, बाजार परवाना विभाग व उद्यान विभाग या



### डिझेलसाठी ॲडव्हान्सची तरतूद

महापालिकेतील अधिकाऱ्यांना पेट्रोल व डिझेलसाठी ॲडव्हान्सची सुविधा उपलब्ध आहे. लॉगबुक भरल्यानंतर वेळेत बिल सादर केल्यास ॲडव्हान्स पेमेंट दिले जाते. त्यामुळे डिझेलचे पैसे संपण्यापूर्वीच ॲडव्हान्स उचलणे अपेक्षित असते, जेणेकरून अशी परिस्थिती निर्माण होणार नाही. मात्र प्रत्यक्षात ही प्रक्रिया का राबवली जात नाही, हा गंभीर प्रश्न उपस्थित होत आहे.

**– दत्तात्रय फिस्के, लेखाधिकारी**

माध्यमातून चालते. या सर्व विभागांना वाहनांची नितांत गरज असते. त्यातच नगरसेवकांकडून विविध प्रभागांमध्ये वाहनांची मागणी केली जाते. मात्र सुरुवातीलाच पेट्रोल-डिझेल उपलब्ध नाही, असे उत्तर दिले जात असल्याने नगरसेवकांचा संताप उफाळून येत आहे.महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर गेल्या आठ दिवसांपासून मैदाने स्वच्छ करणे, मातीचे ढिगारे हलवणे यासाठी जेसीबीची तसेच उद्यान विभागाच्या स्वच्छता वाहनांची मागणी सातत्याने केली जात आहे. काही नागरिकांनी सार्वजनिक शौचालये स्वच्छ करण्यासाठी वाहनांची मागणी केली, मात्र त्यांनाही नकार देण्यात आला. यामुळे एका नगरसेविकेचा संताप अनावर झाला आणि त्यांनी थेट वरिष्ठांकडे तक्रार केली. त्यानंतर संबंधित ठिकाणी जेसीबी व यंत्रणा उपलब्ध करून देण्यात आली. मात्र प्रश्न हा आहे की, अशा तक्रारीनंतरच कामे होणार का? ही परिस्थिती किती दिवस चालणार? प्रशासनाने वेळेवर नियोजन करून इंधनाचा प्रश्न मार्गी लावणे गरजेचे आहे, अन्यथा महापालिकेचा कारभार पूर्णपणे ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# ७० हजार महिलांचे पैसे थांबले ई-केवायसीसाठी मुदतवाढ मागणी




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

अमरावती जिल्ह्यात ७० हजार 'लाडक्या बहिणी' योजनेच्या महिलांचे नोव्हेंबरपासूनचे आर्थिक लाभ थांबले आहेत. गाव पातळीवरील सीएससी आणि सेतू केंद्रधारकांकडून योग्य सहकार्य न मिळाल्याने त्यांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. यामुळे या महिलांनी शासनाकडे ई-केवायसीसाठी मुदतवाढ देण्याची मागणी केली आहे.

या महिला प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहेत. ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी त्यांनी वारंवार सेतू आणि सीएससी केंद्रांना भेटी दिल्या. मात्र, कधी सर्व्हर डाऊन असल्यामुळे तर कधी वीजपुरवठ्यातील अडथळ्यांमुळे ३१ डिसेंबरपर्यंत त्यांची ई-केवायसी पूर्ण होऊ शकली नाही. अनेक महिलांनी आवश्यक कागदपत्रे गोळा केली होती, काहींनी ती केंद्रचालकांकडे जमाही केली होती, तरीही प्रक्रिया वेळेत पूर्ण झाली नाही.

सध्या शासनाने ई-केवायसी दरम्यान चुकीची माहिती अपलोड केलेल्या महिलांना दुरुस्तीची संधी दिली आहे. या महिला आगामी ३१ मार्चपर्यंत आवश्यक दुरुस्ती करू शकतात. याच धर्तीवर, ज्या महिलांची ई-केवायसी झालीच नाही, त्यांनाही ही प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी द्यावी, अशी त्यांची मागणी आहे.

ई-केवायसी न झाल्यामुळे शासनाने या महिलांना अपात्र ठरवून त्यांचे लाभ थांबवले आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांना एकही रुपया मिळालेला नाही. त्यामुळे काही महिला गावच्या सेतू केंद्रांची तर काही जिल्हाधिकारी कार्यालय आणि महिला व बालविकास कार्यालयाची पायपीट करत आहेत. मात्र, शासनाने ई-केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू न केल्यामुळे संबंधित अधिकारीही हतबल झाले आहेत. चुकीच्या दुरुस्तीसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन संधी दिली, त्याचप्रमाणे आम्हालाही संधी मिळावी, असा त्यांचा आग्रह आहे.

अमरावती येथील महिला व बालविकास विभागाचे अतुल भडांगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात सुरुवातीला ७ लाखांहून अधिक 'लाडक्या बहिणीं'चे प्रस्ताव मंजूर झाले होते आणि त्यांना दरमहा दीड हजार रुपये मिळत होते. पडताळणीसाठी शासनाने सर्व महिलांना ई-केवायसी करण्यास सांगितले होते, ज्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर होती. मात्र, सुमारे ७० हजार महिला ही प्रक्रिया पूर्ण करू शकल्या नाहीत. यासंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्या असून, त्याआधारे जिल्हाधिकारी महोदयांकडे प्रस्ताव पाठवला जाईल, असे भडांगे यांनी सांगितले.

# स्वच्छतेत ढिलाई चालणार नाही महापौरांचा थेट कारवाईचा इशारा

## आजपासून पासून मोटारसायकलवर प्रभाग दौरे निष्काळजी अधिकाऱ्यांवर कठोर पावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**



शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली असून स्वच्छतेच्या कामात कुठलीही ढिलाई सहन केली जाणार नाही, असा कडक इशारा महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी दिला आहे. निष्काळजीपणा करणाऱ्या स्वास्थ्य निरीक्षकांवर थेट प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.महापौरांनी प्रशासनाला आदेश देताना प्रत्येक प्रभागातील स्वास्थ्य निरीक्षकांनी दररोज क्षेत्रभेट देणे बंधनकारक असल्याचे सांगितले. रस्ते, नाले, सार्वजनिक ठिकाणे आणि कचरा संकलन केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून नियमित अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांना अस्वच्छतेचा त्रास होणार नाही, याची पूर्ण जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असे त्यांनी नमूद केले.स्वच्छतेबाबत नगरसेवक किंवा नागरिकांकडून तक्रार प्राप्त झाल्यास ती तात्काळ निकाली काढणे बंधनकारक राहील. तक्रारी प्रलंबित ठेवणे अथवा दुर्लक्ष करणे सहन केले जाणार नाही. एखाद्या स्वास्थ्य निरीक्षकाविरुद्ध तक्रार आल्यास थेट कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही महापौरांनी दिला.लोकसहभागावर भरस्वच्छतेच्या मोहिमेत लोकसहभाग अत्यावश्यक असल्याचे सांगत नागरिकांनी कचरा निर्धारित ठिकाणीच टाकावा आणि स्वच्छतेचे नियम पाळावेत, असे आवाहन करण्यात आले. नगरसेवकांनी आपल्या प्रभागात जनजागृती मोहीम राबवावी, अशा सूचना देण्यात आल्या.

**आजपासून प्रत्यक्ष दौरे**

आज १६ फेब्रुवारीपासून दररोज सकाळी ८ ते १० या वेळेत महापौर मोटारसायकलवरून विविध प्रभागांचा प्रत्यक्ष दौरा करणार आहेत. स्वच्छतेच्या कामांचा थेट आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना देण्यात येणार आहेत.माझ्या कार्यकाळात स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य असेल. प्रशासन आणि नागरिकांच्या संयुक्त प्रयत्नांतून अमरावती स्वच्छ व निरोगी बनवू, असा ठाम संदेश महापौरांनी दिला.

# अमरावतीत न्यायाधीशांच्या निवासस्थानी मध्यरात्री चोरी

## लाखोंचा मुद्देमाल लंपास; कांतानगरातील नलदमयंती व शहानुर अपार्टमेंटमध्ये पाच न्यायाधीश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

शहरातील कांतानगर परिसरात न्यायाधिश तसेच न्यायालयीन कर्मचारी, अधिकाऱ्यांचे शासकिय निवासस्थान आहेत. याच निवासस्थान परिसरात चोरट्यांनी शनिवार ते रविवारी (दि. १५) मध्यरात्री दरम्यान पाच न्यायाधीशांच्या घरांसह चार न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे कुलूप बंद घरांना लक्ष केले. यावेळी चोरट्यांनी एकाच रात्री तब्बल नऊ घरांना लक्ष्य करुन चोरी केल्यामुळे खळबळ उडाली आहे.

या नऊ घरातून चोरट्यांनी ९० ते ९५ हजारांचा ऐवज लंपास केल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. विशेष म्हणजे न्यायाधीशांच्या निवासस्थान परिसरात रात्र सुरक्षेसाठी दोन ठिकाणी चार पोलिस तैनात होते. तरीही चोरट्यांनी मागील बाजूने प्रवेश करुन या चोऱ्या केल्या आहेत. कांतानगर भागात एकाच परिसरात येथील जिल्हा न्यायाधीशांसह विवीध न्यायाधीशांच्या शासकिय वसाहती आहेत. त्याच वसाहतींना लागून एका न्यायालयीन कर्मचाऱ्यांची वसाहत आहे. शनिवारी मध्यरात्री अडीच ते तीन वाजताच्या सुमारास पैनगंगा इमारतीत दोन न्यायाधीशांच्या बंद घरांना चोरट्यांनी लक्ष्य करुन ते फोडले. त्यानंतर याच इमारतीपासून सुमारे १०० मीटर अंतरावर असलेल्या नल दमयंती



इमारतीत दोन आणि शहानुर इमारतीत एक अशा पध्दतीने एकूण पाच न्यायाधीशांच्या घरांचे कुलूप तोडून चोरट्यांनी चोरी केली आहे. तसेच बाजुच्या इमारतीमधील कर्मचाऱ्यांचेही घरे चोरट्यांनी फोडली.

पोलिसांच्या तंबूपासून ५० फुट अंतरावरून गेले चोर पैनगंगा व इतर दोन वसाहती असलेल्या कॅम्पसमध्ये रात्रीच्या वेळी दोन पोलिस कर्तव्यावर हजर होते. पोलिसांचा तंबू ज्या ठिकाणी लावलेला आहे, त्या तंबूपासून ५० ते ६० फुट अंतरावरून चोर पैनगंगा इमारतीत शिरले आणि बाहेर निघाले. मात्र तंबूत असलेल्या दोन्ही पोलिसांना त्यांची चाहूल लागली नाही मात्र ज्यावेळी आवाज आला त्यावेळी एका पोलिसाला चोरटा भिंतींवरून उडी मारुन झाडाझुडपात जाताना दिसला मात्र पोलिस भिंतीजवळ जाईपर्यंत चोरट्यांनी पोबारा ठोकला होता. तसेच नल दमयंती आणि शहानुर यात असलेल्या कॅम्पसमध्ये गार्ड रुम समोरच्या बाजूने आहे. त्या ठिकाणी सुध्दा दोन पोलिस कार्यरत होते. मात्र चोरटे मागच्या बाजूने येवून चोरी करुन निघून गेलेत, समोर गार्डरुममधील पोलिसांना याबाबत साधी चाहूलही लागली नाही.

सुट्टीच्या दिवशी हात साफ यामध्ये एका न्यायाधीशांच्या घरातून घड्याळ, एका घरातून दहा हजारांची रोख तर काही ठिकाणाहून चांदी व सोन्याचे दागिने लंपास झाले आहेत. ज्या न्यायाधीशांच्या घरात व कर्मचाऱ्यांकडे चोरी झालेली आहेत. ते रविवारची सुटी असल्यामुळे घरी नव्हते. नेमका याच संधीचा चोरट्यांनी फायदा घेतला आहे. चोरी झाल्याची माहीती मिळताच पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्यासह तिनही पोलिस उपायुक्त्, गुन्हे शाखेचे अधिकारी व पथक, गाडगेनगर ठाण्याचे पोलिस सुध्दा घटनास्थळी पोहोचले होते.

# अमरावतीत 'संत नामदेव' ग्रंथाचे भक्तिमय वातावरणात भव्य विमोचन; मान्यवरांच्या उपस्थितीत सोहळा उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

संतपरंपरेचा दिव्य वारसा जपणाऱ्या आणि समाजमनात अध्यात्माची ज्योत प्रज्वलित करणाऱ्या संत नामदेव बाबा (गणोरीकर) यांच्या प्रेरणादायी जीवनकार्यावर आधारित 'संत नामदेव' या बहुप्रतिक्षित ग्रंथाचा भव्य विमोचन सोहळा आज अमरावती येथे अत्यंत उत्साहात, भक्तिमय वातावरणात आणि मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शहरातील संतभक्त, साहित्यप्रेमी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या मंगल सोहळ्याची शोभा वाढवली.

नवाथे चौक, नंदा मोटर्स समोर येथील नामदेव महाराज समाधी मंदिर येथे सकाळी ठीक ९ वाजता वेदमंत्रांच्या घोषात आणि पारंपरिक विधीनुसार सोळस पूजेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मंदिर परिसरात मंत्रोच्चार, टाळ-मृदंगाचा



निनाद आणि भक्तांच्या जयघोषामुळे वातावरण पूर्णतः आध्यात्मिक रंगात न्हाऊन निघाले होते. उपस्थित भाविकांनी संत नामदेव बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.दुपारी ३ वाजता प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ग्रंथाचे औपचारिक विमोचन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून विलासभाऊ इंगोले, संस्थेचे अध्यक्ष मुकेश इंगोले, प्रदीप त्र्यंबकराव चौधरी, वंदनाताई प्रदीपजी चौधरी, संजय रा. महल्ले, अरविंदभाऊ उतखेडे, रावसाहेब यादगिरे, नितीन मोहोड, दामोदर भुजाडे, सुनील मानकर, प्रणव वैद्य, भरत देशमुख, गजानन अरबट, गोपाळ पुसतकर विशाल देशमुख तसेच अवंतिका व सुकृत प्रदीपजी चौधरी यांची उपस्थिती लाभली.यावेळी संत दत्तगिरी महाराज, संत मोहनगिरी महाराज, किशोर तायडे महाराज तसेच संत नामदेव महाराजांच्या सहवासाचा लाभ घेतलेले श्री. सदाशिवराव मोडक यांचे आशीर्वाद लाभले. संतांच्या कार्याचे स्मरण करत मान्यवरांनी आपल्या मनोगतात संत नामदेव बाबा यांच्या साधेपणाचे, समाजसेवेचे आणि अध्यात्मिक मार्गदर्शनाचे विशेष कौतुक केले. त्यांच्या कार्यामुळे असंख्य भाविकांना जीवनदिशा मिळाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.या कार्यक्रमासाठी खऱ्या अर्थाने ज्यांनी मनापासून मेहनत घेतली, नियोजनापासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर सक्रिय सहभाग नोंदवला, असे कर्तृत्ववान व समर्पित व्यक्तिमत्त्व म्हणजे सुधीर भाऊ भोरे. त्यांच्या अथक परिश्रम, धडपड आणि जबाबदारीच्या जाणीवेनेच हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. त्यांच्या योगदानाबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व विशेष अभिनंदन व्यक्त करण्यात येत आहे.

**उपस्थितीने वाढवली सोहळ्याची शोभा**

संतभक्त, साहित्यप्रेमी, सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची वर्दळ होती. अनेकांनी ग्रंथ खरेदी करून लेखिकेकडून स्वाक्षरीही घेतली.अध्यात्म, संस्कृती आणि साहित्य यांचा संगम घडवून आणणारा हा सोहळा अमरावतीकरांसाठी अविस्मरणीय ठरला. संत नामदेव बाबा यांच्या कार्याची प्रेरणा समाजमनात दीर्घकाळ जागृत राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि समाधानाच्या भावनेने संपन्न झाला.

# स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती जीवनगौरव पुरस्काराने प्रकाश पोहरे सन्मानित

## विलास बडे यांना स्व.जुगल किशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार प्रदान : वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा, चंद्रकांत भड यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार : अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार सोहळा थाटात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणाऱ्या विविध पत्रकारिता पुरस्कारांचा वितरण सोहळा शनिवारी थाटात पार पडला. स्व.दादासाहेब काळमेघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जाणारा राज्यस्तरीय पत्रकारिता जीवनगौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक तथा शेतकरी चळवळीतील अग्रणी प्रकाश पोहरे यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यासोबतच स्व.जुगलकिशोर अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पुरस्काराने न्यूज १८ मराठीचे संपादक विलास बडे यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विभागस्तरीय आणि जिल्हास्तरीय पत्रकारिता पुरस्कार देखील वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा आणि चंद्रकांत भड यांना या कार्यक्रमात प्रदान करण्यात आले.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या स्व. सोमेश्वर पुसदकर सभागृहात अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकारित पुरस्कार सन्मान सोहळा पार पडला, यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल होते. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंत वानखडे, राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे, महापौर श्रीचंद तेजवानी, पोलिस आयुक्त राकेश ओला, सकाळ समुहाचे संपादक राहुल गडपाले, मराठी पत्रकार परिषदेचे माजी अध्यक्ष सिद्धार्थ शर्मा, अकोला जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष मिर शौकत अली, सत्कारमूर्ती दै.देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे, विलास बडे, वसंतराव घुईखेडकर, प्रवीण आहुजा, चंद्रकांत भड, यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात स्व. दादासाहेब काळमेघ स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार देऊन दैनिक देशोन्नतीचे संपादक प्रकाश पोहरे यांना प्रदान करण्यात आला. ४१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तर स्व. जुगलकिशोरजी अग्रवाल स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार देऊन आयबीएन १८ मराठीचे संपादक विलास बडे यांचा सन्मान करण्यात आला. ३१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यासोबतच राहुल गडपाले पुरस्कृत विभागीय पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. नमो महाराष्ट्रचे संपादक वसंत घुईखेडकर यांचा सपत्नीक सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. २१ हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप होते. तसेच दै.विदर्भ मतदार पुरस्कृत जिल्हास्तरीय शहर पत्रकारिता पुरस्कार दै. प्रतिदिन अखबारचे वृत्त संपादक प्रवीण आहुजा तसेच पी.आर.पोटे एज्युकेशनल ग्रुप पुरस्कृत जिल्हा ग्रामीण पत्रकारिता पुरस्कार देऊन दै. मातृभूमीचे चंद्रकांत भड यांचा सन्मान करण्यात आला. ११ हजार हजार रूपये रोख, शाल, श्रीफळ तसेच सन्मानचिन्ह असे या दोन्ही पुरस्काराचे स्वरूप होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संजय शेंडे यांनी सुत्रसंचालन सरचिटणीस प्रफुल्ल घवळे यांनी तर आभार प्रदर्शन प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरचिटणीस प्रफुल्ल घवळे, सुधीर भारती, उपाध्यक्ष उल्हास मराठे, चंदू सोजातिया, संजय शेंडे, अरूण जोशी, अनुप गाडगे, अरूण तिवारी, कोषाध्यक्ष विजय ओडे, सहकोषाध्यक्ष सूनील धर्माळे, सहसचिव प्रणय निर्वाण, संजय बनारसे, प्रसिद्धी प्रमुख गौरव इंगळे, ग्रामीण प्रतिनिधी हेमंत निखाडे, कार्यकारिणी सदस्य मंगेश तायडे, सुरेंद्र आकोडे, नितेश राऊत, अमर घटारे, स्वप्नील उमप, विजय धामोरीकर, छाया काळमेघ, स्वीकृत सदस्य डॉ.लोभस घडेकर, सूधीर केने, यशपाल वरठे, अशोक जोशी तसेच पत्रकार विवेक दोडके आणि प्रेम कारेगावकर कार्यालयीन व्यवस्थापक रोशन जोंधळे यांनी प्रयत्न केले. तसेच या कार्यक्रमाला जिल्हाभरातून शहर तसेच ग्रामीण भागातील पत्रकार बांधव, राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



### पत्रकारितेचा वारसा अमरावती शहरात जीवंत

अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाचे काम कौतुकास्पद आहे. अमरावती शहराला पत्रकारितेचा मोठा वारसा असून तो वारसा कायम ठेवण्याचे काम आजही नवी पिढी करताना दिसून येत आहे. स्व.बाळासाहेब मराठे यांच्याकडून आम्हाला पत्रकारितेत प्रेरणा मिळाली. वृत्तपत्र चालविणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. हे काम करणाऱ्यांचा संघर्ष समजून घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे सर्वसामान्यांचे प्रश्न ज्वलंतपणे मांडण्याचे काम आम्ही करतो आहे असे वसंतराव घुईखेडकर यांनी सांगितले.

### पत्रकारितेची भुमिका महत्वाची

मन की बात मुळे पत्रकारितेचे महत्व कमी झाले. आम्ही बोललो की माईक बंद होतात. त्यामुळे पत्रकार हाच आमचा आवाज आहे. आज योग्य विषयावर आम्ही बोललो नाही तर उद्याची पिढी माफ करणार नाही. समाजाचे चित्र जनतेच्या समोर आणण्यासाठी पत्रकारितेची भुमिका महत्वाची असल्याचे बळवंत वानखडे यांनी आपल्या भाषणातून सांगितले.

### पत्रकारांविषयी नेत्यांच्या मनात आदर असतो

व्यक्त होणे ही माणसाची प्रवृत्ती आहे. त्यामुळे कोणत्यातरी प्लॅटफॉर्मवर लोक येऊन आपली मत मांडत असतात. पत्रकारांचे योगदान हे समाजासाठी अत्यंत मोठे आहे. पत्रकारांपासून सावध राहण्याची भुमिका नेत्यांची असते. पत्रकारांविषयी भितीमिश्रित आदर नेत्यांच्या मनात असतो असे प्रतिपादन राज्यसभा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी केले.

### धर्मजातीच्या राजकारणात सर्वकाही गुंडाळल्या जाते आहे

बँकांमध्ये डिपॉजिट ठेवणारा शेतकरी आज गहाण ठेऊन कर्ज घेणारा कर्ज बाजारी झाला. कुठल्याही कागदाशिवाय कर्जमाफी करणारा शेतमालाच्या किमती वाढविणारा पंतप्रधान मनमोहन सिंग होते. अन्नदाता असलेला शेतकरी आज चुकीच्या धोरणामुळे याचक बनला आहे. युएस डीलमुळे शेतकऱ्यांच्या शवपेटीवर खिळा ठोकण्याच काम केल जाते आहे. जातीधर्माच्या राजकारणात आज राजकारण्यांनी सर्वकाही गुंडाळून ठेवले आहे. पत्रकारसंघाने केलेला सन्मान हा आजीवन लक्षात राहील भावना प्रकाश पोहरे यांनी सत्काराला उत्तर देत असताना सांगितले.

### प्रिंट मिडियामुळेच पत्रकारिता जीवंत आहे

शेतकऱ्यांच्या समस्येवर चर्चा होणे ही चांगली व आवश्यक गोष्ट आहे. समाजाच्या समस्यांचे समाधान पत्रकारच करेल ही अपेक्षा सर्वांना असते. २०१४ नंतर पत्रकारांनी त्यांचे काम करत राहणे हीच मोठी क्रांती आहे. प्रिंट मिडियाचे अस्तित्व धोक्यात असल्याचे बोलले जाते मात्र प्रिंट मिडियामुळेच पत्रकारिता जीवंत आहे. आजही वृत्तपत्रांची संख्या वाढते आहे हे प्रिंट मिडियाच्या जीवंतपणाचे लक्षण आहे. आज ज्याला सोशल मिडिया म्हणतो तो मिडिया नसून तो सोशल प्लॅटफॉर्म आहे. राजकीय सत्तेसाठी पत्रकारिता कधीच चांगली नसते आणि तीच खरी पत्रकारिता आहे असे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष अनिल अग्रवाल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.

### तत्वांशी ठाम राहून पत्रकारिता करणे आवश्यक

पत्रकारांचे कौतुक करण्यासाठी सर्वसामान्य जनता येते तेव्हा आम्हाला काम करण्याची प्रेरणा येते. हा पुऱसकार मी पायात चिखल तुडविणाऱ्या बळीराजाला मी समर्पित करतो. पत्रकार क्रांतीकारक नाही परंतू आम्ही समाजासाठी काम करतो. लोकशाही टिकली पाहिजे. येणारा काळ अवघड आहे. पत्रकारांनी तत्वांशी ठाम राहून काम करायला हवे. आम्हीच समाजाचे वकिल आहोत. प्रश्न मांडणे आमचे काम आहे. अजेंडाधारी पत्रकारिता न करता पत्रकारितेच्या मुल्याशी प्रतारणा न करता काम करणे गरजेचे आहे. सामान्य माणसाची आशा मरता कामा नये अशा शब्दात विलास बडे यांनी पत्रकारितेविषयीची भावना विशद केली.

# इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मिळणार राज्यभर मोफत दप्तर

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांसाठी शासनाचा निर्णय; १०० टक्के पटनोंदणी व गुणवत्तापूर्ण शिक्षणाला चालना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षापासून मोफत दप्तर देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण व शाळांमध्ये १०० टक्के पटनोंदणी सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अधिकार प्राप्त आहे. तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत आनंददायी, उत्साहवर्धक व शैक्षणिकदृष्ट्या अनुकूल वातावरणात २१ व्या शतकातील कौशल्यांनी परिपूर्ण, समग्र व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्यावर भर देण्यात आला आहे.या पार्श्वभूमीवर दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली शालेय शिक्षण विभागातील शाळा, विद्यार्थी व शिक्षकांसाठी विविध



विशेष उपक्रमांबाबत चर्चा झाली. त्यानुसार राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना मोफत दप्तर देण्याचा निर्णय घेण्यात आला.राज्य शासनामार्फत सध्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण केले जाते. तसेच प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना अंतर्गत दुपारचे जेवण दिले जाते. विद्यार्थ्यांची १०० टक्के उपस्थिती व गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यात आता मोफत दप्तर योजनेची भर पडली आहे.बृहन्मुंबई महानगरपालिका व पुणे महानगरपालिका या ठिकाणी महानगरपालिकेच्या निधीतून विद्यार्थ्यांना दप्तर अथवा त्यासाठी रक्कम दिली जाते. त्यामुळे ज्या महानगरपालिका स्वतःच्या निधीतून ही योजना राबवितात, त्या शाळांतील विद्यार्थी राज्य योजनेतून वगळले जातील. मात्र राज्यातील इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तराचा लाभ मिळणार आहे.या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार असून शालेय शिक्षण अधिक सुलभ व आकर्षक होण्यास मदत होणार आहे.

**४१ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना लाभ**

राज्यात सन २०२६-२७या शैक्षणिक वर्षांत एकूण ४१,४३०५४ विद्यार्थ्यांना या मोफत शालेय दप्तर योजनेचा लाभ मिळणार आहे. या विद्यार्थ्यांना शाळेची व अभ्यासाची गोडी लागावी, ते शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर जावू नये, आर्थिक अडचणीमुळे त्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होवू नये यासाठी नाविण्यपूर्ण उपक्रम म्हणून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने हा निर्णय घेतला असून राज्यातील सुमारे ४१ लाख ४३ हजाराहून जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे.

# आरटीओ अधिकाऱ्यांच्या पदोन्नती यादीत लाचखोर आणि फौजदारी गुन्हेगारांची नावे

## अमरावती येथे कर्तव्य बजावणारे आरटीओ यांची देखील पदोन्नतीच्या यादीत नाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

राज्याच्या प्रादेशिक परिवहन विभागाने उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यासंदर्भात ४० जणांची यादी अधिसूचनाद्वारे प्रसिद्ध केली आहे. मात्र, यात पाच ते सहा आरटीओ अधिकाऱ्यांवर लाचखोरी, फौजदारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल असताना या आरटीओंची नावे पदोन्नतीत आली कशी? हा संशोधनाचा विषय आहे. त्यामुळे मंत्रालयातील परिवहन विभागात सुद्धा 'जी फार्म' पोहोचल्याची शंका उपस्थित होत आहे.

राज्याच्या (गृह विभाग) विभागाने ९ फेब्रुवारी २०२६ रोजी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, कोकण-१, कोकण-२, पुणे या महसूल विभागासाठी ४० आरटीओंना उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यासाठी यादी प्रसिद्ध केली आहे.

मात्र यात पाच ते सहा अधिकाऱ्यांवर लाचखोरी, फौजदारी स्वरूपाचे गंभीर गुन्हे दाखल आहे, तसा अहवाल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने परिवहन विभागाकडे पाठविला होता. मात्र, हा अहवाल परिवहन विभागाने शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविला नाही. लाचखोरी, फौजदारी गुन्हे दाखल असलेला अहवाल दडविण्यामागे परिवहन विभागाचे कारण काय?, असे प्रश्न उपस्थित होत आहे. यात विदर्भातील नागपूर, गोंदिया, अमरावती येथे




कर्तव्य बजावणारे आरटीओ यांची देखील पदोन्नतीच्या यादीत नाव असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आरटीओ अधिकाऱ्यांच्या पदोन्नती यादीच्या अनुषंगाने चौकशी सुरू असल्याचे परिवहन विभागाचे उपसचिव चेतन निकम यांनी सांगितले.

**परिवहन आयुक्त कार्यालय संशयाच्या भोवऱ्यात**

पदोन्नती यादीतील पाच ते सहा आरटीओंवर लाचखोरी, विभागीय चौकशी, फौजदारी अशा विविध प्रकारची गुन्हे दाखल आहेत. मात्र 'जी फार्म'मुळे परिवहन आयुक्त कार्यालयाने पदोन्नती यादीतील अधिकाऱ्यांचा गोपनीय अहवाल दडवून ठेवल्याची शंका बळावली आहे. कारण परिवहन विभागात चांद्यापासून, तर बांध्यापर्यंत 'जी फार्म' प्रचलित असून, देवाण-घेवाण झाली की 'सब कुछ ओके' असा कारभार आरटीओत चालतो, हे सर्वश्रुत आहे.

**ही आहेत पदोन्नतीतील अधिकाऱ्यांची नावे**

मनोज ओतारी, सचिनकुमार गिरी, श्रीकृष्ण नकाते, स्वप्नील माने, सिद्धार्थ ठोके, निखील सांळुखे, सुजीत डोंगरजाळ, पवन नव्हाळे, प्रसाद नलवडे, योगेश ताटु, विजय शेळके, प्रशांत साळी, सचिन विधाते, प्रवीण बागडे, सतीश जाधव, गजानन ठोंबरे, उत्तम जाधव, चारूदत्त व्यवहारे, राजेंद्र केसकर, अमर देसाई, कैलास कोठावदे, गणेश पाटील, सुरेश आव्हाड, दीपक शिंदे, विनोद साळवी, गजानन गावंडे, विलास चौधरी, अमरसिंह गवारे, विजय ईंगवले, युवराज पाटील, संदीप म्हेत्रे, आनंद मेश्राम, रावसाहे रगडे, निलेश धोटे, अजित ताम्हणकर, शाम कासार, माधव सूर्यवंशी, नंदिकशोर काळे, संदीप निमसे, मनीष दौंड.

**पदोन्नती यादीतही 'फिक्सींग'**

कोणत्याही विभागात अधिकाऱ्यांची पदोन्नती यादी प्रसिद्ध करताना मेरीट लिस्ट प्रकाशित केली जाते. पदोन्नती यादीतील नावे ही जास्त असतात. मात्र आरटीओ अधिकाऱ्यांना उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी म्हणून पदोन्नती देताना केवळ ४० जणांचीच अंतिम यादी अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे या पदोन्नती यादीतही 'फिक्सींग' असल्याचे बोलले जात आहे.

# पराभव दिसताच पीसीबी अध्यक्ष मोहसीन नकवींचे पलायन; शेवटचा चेंडू पहायला देखील थांबले नाहीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६कोलंबो**

क्रिकेटच्या मैदानात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हायव्होल्टेज लढत पुन्हा एकदा एकतर्फी ठरली आहे. कोलंबोच्या प्रेमदासा स्टेडियमवर भारतीय संघाने पाकिस्तानचा धुव्वा उडवत आपला विजयरथ कायम राखला. भारताने दिलेल्या १७६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना पाकिस्तानी फलंदाजांनी अक्षरशः नांगी टाकली. आपल्या संघाची दैना आणि निश्चित असलेला पराभव पाहून पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसीन नकवी यांच्यासह पाकिस्तानी प्रेक्षकांनीही सामना संपण्यापूर्वीच स्टेडियममधून काढता पाय घेतला.

केवळ बोर्डाचे अध्यक्षच नव्हे, तर मोठ्या आशेने सामना पाहायला आलेल्या पाकिस्तानी चाहत्यांनीही 'बॉयकॉट'चा मार्ग स्वीकारला. १८ व्या षटकात पाकिस्तानचा संघ केवळ ११४ धावांवर गारद झाला. जेव्हा संघाचे ५ महत्त्वाचे फलंदाज अवघ्या ७३ धावांवर बाद झाले, तेव्हाच चाहत्यांनी स्टेडियम सोडायला सुरुवात केली होती. सोशल मीडियावरही पाकिस्तानी चाहत्यांनी आपल्या संघाच्या खराब कामगिरीवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

भारताच्या १७६ धावांच्या लक्ष्याचा बचाव करताना जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांनी सुरुवातीच्या ४ षटकांतच पाकिस्तानचे कंबरडे मोडले. दोघांनी मिळून २५ धावांत ३ बळी घेतले. अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांनीही प्रत्येकी दोन बळी घेत पाकिस्तानला सावरण्याची संधीच दिली नाही. विशेष म्हणजे, अर्धवेळ फिरकीपटू तिलक वर्मानेही आपल्या पहिल्याच चेंडूवर शादाब खानला बाद करून विजयावर शिक्कामोर्तब केले.

# जिल्ह्यातील शिवालयांमध्ये दिवसभर उसळली भाविकांची तुफान गर्दी

## आज सर्वत्र महाप्रसादाची धूम




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

संपूर्ण जिल्हाच 'हर..हर..शंभो...हर..हर.. महादेव... बम बम भोले 'च्या गर्जनेने निनादला होता. महाशिवरात्री निमित्त सालबर्डी, कोंडेश्वर, गडगडेश्वर, तपोवनेश्वर, खंडेश्वर, लासुर येथील आनंदेश्वर मंदिरासह अमरावती शहर तसेच जिल्ह्यातील सर्व शिवालयांमध्ये शिवालयांमध्ये रविवार १६ फेब्रुवारीला महादेवाच्या दर्शनासाठी शिवभक्तांचा अलोट सागर लोटला होता. महाशिवरात्रीसाठी शहरातील सर्वच शिवालये सजली होती. अनेक ठिकाणी आकर्षक रोषणाई, सुरेख आरास करण्यात आली. विशेष म्हणजे सर्वच शिवालयात शाबुदाना खिचडीसह हजारो क्विंटल फराळाचे वाटप भाविकांना वाटपकरण्यात आले.महाशिवरात्रीच्या पर्वावर श्रीक्षेत्रकोंडेश्वर येथे भाविकांची प्रचंड गर्दी उसळली आहे. दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.अमरावती शहरापासून ११ किलोमीटर अंतरावर कोंडेश्वर हे तीर्थक्षेत्र आहे. निसर्गाच्या कुशीत असलेल्या कोंडेश्वर मंदिराला प्राचीन महत्त्व आहे. जिल्ह्याच्याच नव्हे तर विदर्भाच्या काना कोपऱ्यातून भाविक येथे दर्शनासाठी येतात. महाशिवरात्रीनिमित्त येथे मोठी यात्रा भरली असून जत्रेमध्ये प्रचंड गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या.

**तपोवनेश्वरमध्ये रांगाच रांगा**

त्याचप्रमाणे तपोवनेश्वर हे देखिल एक जागृत मंदिर आहे. या



ठिकाणी सकाळपासून भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. या ठिकाणी भाविक भक्तांसाठी फराळाचे तसेच मठ्याचे वाटप मोठ्या उत्साहात करण्यात आले.

**सालबर्डी शिवसागर लोटला**

मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील सालबर्डी हे देखिल एक जागृत शिवमंदिर आहे. हे मंदिर जंगलात व व उंचावर असून येथील भुयारात आपोआप तयार झालेले शिवलिंग आहे. नैसर्गिक सुंदर वातावरणामुळे येथे पर्यटकांचा देखिल वर्षभर राबता असतो. सालबर्डीला छोटा महादेव असेही संबोधले जात असून दर्शनासाठी लांबच लांब रांगा याठिकाणी लागल्या होत्या.

**एसटीची विशेष बस सेवा**

सालबर्डी, तपोवनेश्वर, कोंडेश्वरसाठी विशेष बसेस एसटी महामंडळाच्यावतीने सोडण्यात आल्या. सालबर्डीसाठी अमरावती मुख्य डेपो, मोर्शी डेपो, वरुड डेपोतून सकाळपासून गाड्या सोडण्यात आल्या. तर कोंडेश्वरसाठी बडनेरा डेपोतून स्पेशल यात्रा बसेसची व्यवस्था करण्यात आली होती.

**बम बम भोले... चा गजर**

शहरात जुन्या टाकसाळ परिसरात जागृत भोलेश्वर मंदिर, साईनगर बेनाम चौकातील शिवालय, गोपाल नगर, दसरा मैदान शिवालय, सतिधाम मंदिर, सोमेश्वर मंदिर भाजीबाजार, भुतेश्वर मंदिर, संक्रेश्वर शिवमंदिर, सालबर्डी, नांदगाव खंडेश्वर येथील खंडेश्वर शिवालय, छत्री तलाव रोडवरील रत्नापूर, तुळजागीर वाडा मच्छिसाथ परीसरातीस शंकर मंदिर, अंबागेट शंकर मंदिर, कंवर नगर, अंबिकानगर, मुदलीयार नगर, दस्तुर नगर चौकातील शंकर मंदिर आदींसह विविध ठिकाणी 'बमबम भोले'चा गजर सकाळपासून दिवसभर सुरु होता. या सर्व ठिकाणी फराळाचे वाटप करण्यात आले.

**बेल-फुल - प्रसादाची दुकाने सजली**

महाशिवरात्रीनिमित्त शिवालयांच्या परिसरात बेल, फुले, हारांची दुकाने सजली होती. त्याचप्रमाणे प्रसादाच्या विक्रीसाठीही तसेच पूजा साहित्याची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.

**शहरात जिकडे तिकडे फराळाचे स्टॉल्स**

महाशिवरात्रीनिमित्त बहुतांश लोकांना उपवास असतो. त्यामुळे शहरात बुधवारला ठिकठिकाणी फराळाचे पदार्थ विक्रीसाठी स्टॉल्स लागली होती. उपवासाचे पॅटीस, बटाटेवडे, साबुदाणा ऊसळ, ताक आदींची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.शहरातील बेनोडा परिसरातील टेकडीवर असलेल्या श्री गौरक्षण संस्थेच्या भूमीवर असलेल्या पुरातन शिवमंदिर महादेव खोरी येथे शिवरात्रीच्या पवित्र सणानिमित्त बुधवारला अभिषेक पार पडला. स्थानिक गोरक्षण गटाद्वारे चालवल्या जाणाऱ्या बेनोडा परिसरातील महादेव शिवालयात शिवरात्रीला सकाळपासून हजारो शिवभक्त दर्शन घेतले.

# देशविरोधी भाषा सहन केली जाणार नाही - नवणीत राणा यांचा इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

एका सार्वजनिक कार्यक्रमात बोलताना नवनीत राणा म्हणाल्या, धिरेंद्र शास्त्री महाराज म्हणतात की संतो की माला के साथ हाथों में भाला भी होना जरूरी है आणि मी महाराष्ट्राची बेटी आहे, त्यामुळे माझ्या हातात भाला आणि तलवारही आहे.नवनीत राणा यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. त्यांनी केवळ धार्मिक मुद्द्यांवरच नव्हे तर पश्चिम बंगालमधील बाबरी मशिदीच्या संदर्भातही अत्यंत तीव्र शब्दांत इशारा दिला आहे.जे लोक पश्चिम बंगालमध्ये बाबरी मशीद बांधण्याची भाषा करत आहेत, त्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी तुमची कबर खोदण्यासाठीही हिंदुस्थानमध्ये जागा मिळणार नाही, असे खळबळजनक वक्तव्य नवनीत राणा यांनी केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, तुम्ही फक्त सुरुवात करून दाखवा. आमच्यासारखे सनातनी तिथे येतील आणि तुम्हाला हिंदुस्थानची खरी ताकद काय आहे ते दाखवून देतील.असेही नवनीत राणा म्हणाल्यात.

# कठोरा नाका ज्वेलर्स लुटमारीचा ४८ तासात उलगडा ७ लुटारू जेरबंद, १.१२ कोटींचा मुद्देमाल जप्त

## ७०० ग्रॅम सोने एक वाहन, एक चाकू आणि मोबाईल ताब्यात बंटी आणि दबंग हे मुख्य सूत्रधार






**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ अमरावती**

स्थानिक पोटे कॉलेज मार्गावर एका सुवर्णकाराशी लुटमारी करणाऱ्या सात जणांच्या टोळीला शहर गुन्हे शाखेने तत्परता दाखवित अवघ्या ४८ तासात अटक करण्यात यश मिळविले. या टोळीच्या ताब्यातून सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्य असा १ कोटी १२ लाख ३२ हजार रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सैयद इम्रान सैयद मिर उर्फ दबंग (वय ३२, रा. लालखडी मदरसा जवळ, अमरावती), फिरोज खान कासम खान (वय ३२, रा. बिस्मिल्लानगर, लालखडी, अमरावती), शोएब खान अमिन खान (वय २१, रा. रहमतनगर), शेख इम्रान उर्फ इम्मू शेख रहेमान (वय ३२, रा. हबीबनगर नं. १), शेख रिझवान उर्फ कालू अब्दुल रहेमान खान (वय १९, रा. हैदरपुरा), शुभम उर्फ बंटी ज्ञानेश्वर खंडारे (वय ३३, रा. कठोरा बु.) व सुरज सिध्दार्थ तायडे (वय ३५, बोरगाव धर्माळे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नाव आहेत. त्यांच्या ताब्यातून १ कोटी ५ लाखांचे दागिने, १ लाख १९ हजार रूपये रोख, सात मोबाईल व गुन्ह्यात वापरलेले तीन चाकू असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. अटकेतील आरोपींनी बडनेरा, नागपुरी गेट, नांदगाव पेठ, गाडगेनगर, तिवसा,येथे अनेक वाटमारीचे गुन्हे केल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

स्थानिक बालाजीनगर येथील सुशांत शेरेकर यांचे स्वावलंबीनगर येथे सुमित्रा ज्वेलर्स आहे. १३ फेब्रुवारीच्या रात्री ९ वाजता ते नेहमीप्रमाणे दुकान बंद करून दुचाकीने घराकडे निघाले होते. त्यांनी दुकानातील सोन्याचे दागिने आपल्या दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवले होते. दरम्यान एक कार आली व त्यांना धडक देऊन त्यातील तीन जणांनी उतररून सुशांत शेरेकर यांना चाकूचा धाक दाखवित त्यांच्या दुचाकी वाहनातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम जबरीने हिसकावून नेली होती. घटनास्थळी पोलीस आयुक्तांनीही भेट दिली होती. त्यांनी लुटारूंच्या शोधार्थ चार पोलीस पथक तैनात केले होते.

**हिस्से-वाटणीच्या वेळी पोलिसांना मिळाली टीप**

लुटमारीच्या घटनेनंतर पोलिसांनी पोटे कॉलेज मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. पोलिसांचा तांत्रिक तपास सुरू असताना इम्रान दबंग व सुरज तायडे या दोघांना आपल्या इतर पाच साथिदारांसह ही घटना केल्याची माहिती पोलिसाना मिळाली. नांदगाव पेठ टोल नाक्याजवळील गुणवंत महाराज रेस्टॉरंट येथे सुरज तायडे व त्याचे साथिदार हिस्से वाटणीसाठी येत असल्याची गुप्त माहिती पोलिसाना मिळाली. त्यानुसार पोलिसानी सापळा रचून आरोपींना रंगेहात अटक केली.

# मनरेगा मजुरी थकीत राहिल्यास आंदोलनाचा इशारा

## बच्चू कडू यांचा सरकारला दम : नागपूर आयुक्तालयात घुसण्याचा दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६, अमरावती**

अमरावती जिल्ह्यात होळीच्या तोंडावर मनरेगा (MREGS) अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांची कोट्यवधींची मजुरी रखडल्याने संताप व्यक्त केला जात आहे. मेळघाटातील सुमारे ५० हजार आदिवासी मजुरांचे तब्बल २२ कोटी २८ लाख रुपये थकीत असून, जिल्हाभरातील एकूण ३५ कोटी ७ लाख रुपये मजुरी अद्यापही मिळालेली नाही. होळीपूर्वी मजुरांच्या खात्यात मजुरी जमा न झाल्यास नागपूर येथील आयुक्तालयात घुसून आंदोलन करू, असा इशारा माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिला.नियमाप्रमाणे पंधरा दिवसांच्या आत मजुरांना मजुरी मिळणे अपेक्षित आहे. योजनेची बिले निघतात, ठेकेदारांची देयके दिली जातात; मात्र मजुरांना पैसे नाहीत. मग त्यांनी जगायचे कसे? राज्यकर्त्यांना याचे भान आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. संजय गांधी निराधार योजना, दिव्यांग योजना तसेच लाडक्या बहिणी योजनेचेही पैसे प्रलंबित असल्याचा आरोप करत त्यांनी मंत्र्यांनी लाज वाटली पाहिजे, अशी टीका केली. होळीपूर्वी मजुरी न दिल्यास नागपूर आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशारा त्यांनी पुन्हा दिला.दरम्यान, ४० पैकी ३८ विभागांनी दिव्यांगांची माहिती लपविल्याच्या मुद्द्यावर



बोलताना कडू म्हणाले की, दिव्यांग मंत्रालय स्थापन झाल्यानंतर काम वेगाने होईल, अशी अपेक्षा होती; मात्र प्रत्यक्षात स्थिती समाधानकारक नाही. दिव्यांगांच्या हक्कांकडे दुर्लक्ष करणाऱ्या विभागावर कारवाई झाली पाहिजे; अन्यथा आम्ही मंत्रालयात जाऊन आंदोलन करू, असा इशाराही त्यांनी दिला. अमरावतीतील न्यायाधीशांच्या निवासस्थानी झालेल्या घरफोडीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी कायदा-सुव्यवस्थेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. राज्यातील यंत्रणा कुचकामी झाली आहे. न्यायाधीशांच्या घरात चोरी होत असेल, तर सर्वसामान्यांचे काय? असा सवाल करत त्यांनी पोलिस प्रशासनावर टीका केली.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायदा-सुव्यवस्था कडक करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, असा सल्ला देत राज्यात प्रशासनाचा दरारा निर्माण करण्याची गरज असल्याचे कडू यांनी नमूद केले.

# राज्यातील सर्वच ग्रामपंचायती शुक्रवारी बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायती शुक्रवारी, २० फेब्रुवारी रोजी बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विविध प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय सरपंच परिषदेकडून राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींच्या तत्काळ निवडणुका घ्याव्यात. प्रलंबित ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत नाहीत तोपर्यंत प्रशासक म्हणून सरपंचांची नियुक्ती करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासक म्हणून सरपंचांची



नियुक्ती करावी या प्रमुख मागणीसाठी हे आंदोलन करण्यात येतंय. या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत कार्यालयांचं कामकाज पूर्णतः ठप्प राहणार आहे. त्यामुळे नागरिकांना शासकीय सेवांसाठी अडचणींचा सामना करावा लागू शकतो. सरकार याबाबत काही तोडगा काढतोय का? ते पाहावे लागणारेय.

# वायुवाहिनी प्रकल्प पूर्ण; अमरावतीत मिळणार अखंड सीएनजी सेवा

## सीएनजीचे सहा फिलिंग स्टेशन कार्यरत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

पेट्रोल आणि डिझेलला सक्षम पर्याय म्हणून सीएनजीचा वापर वाहनात इंधन म्हणून केला जातो. दोन वर्षांपुर्वी अमरावतीत सीएनजी पुरवठा सुरू झाला मात्र सीएनजी थेट लातूरवरुन ट्रकद्वारे (कासकेड/सीलींडर) आणला जात होता. त्यामुळे दोन ते तीन दिवसाआड सीएनजी तोसुध्दा तुरळक प्रमाणात मिळायचा, त्यामुळे प्रत्येक फिलींग स्टेशनवर वाहनांच्या तासनतास मोठ मोठ्या रांगा लागत होत्या. मात्र आता मुंबई ते नागपूर समृध्दी महामार्गालगत असलेल्या गेलची (गॅस ऑथर्टी ऑफ इंडीया) वायूवाहीनी सुरू झाली आहे. त्यामुळे अमरावतीत आता चोविस तास तोसुध्दा मुबलक सीएनजी उपलब्ध झाला आहे. सद्या शहर व जिल्ह्यात बोरगाव धर्माळे, लोणी, चांगापूर, पुर्णानगर, नांदगाव खंडेश्वर आणि शिरजगाव कसबा या सहा ठिकाणी फिलींग स्टेशन कार्यान्वित आहेत.





महामार्गावर नांदगाव खंडेश्वरजवळ असलेल्या बोरी गावच्या परिसरात सीएनजीचे मदर स्टेशन कार्यान्वित झाले आहेत. त्यामुळे अमरावतीच्या फिलींग स्टेशनवर त्याच ठिकाणावरुन गॅस मिळतो आहे. मागील दोन वर्ष फिलींग स्टेशनवर लातूर जिल्ह्यातील मदर स्टेशनवरुन म्हणजेच ४७० किलोमीटरवरुन सीएनजी आणला जात होता.

सीएनजी पुर्वी लातूरवरुन आणला जायचा, पुर्वी सहा फिलींग स्टेशनवर दिवसाला सरासरी ३ हजार किलो सीएनजी मिळायचा, आता मात्र दरदिवशी सरासरी साडेसहा ते सात हजार किलो सीएनजी उपलब्ध होत आहेत. अंतर कमी झाल्यामुळे दुप्पटहून अधिक सीएनजी उपलब्ध होत आहे. जिल्ह्यात सीएनजी वाहनांची संख्या प्रचंड वाढत असल्यामुळे मागणीसुध्दा वाढली आहे. आता नव्याने सहा स्टेशन सुरू झाल्याने मोठा लाभ मिळणार आहे.

**मुंबई आणि झारसुगुडा दोन्ही ठिकाणांवरुन गॅस**

समृध्दी महामार्गालगत गेलच्या वायुवाहीनीमधून नांदगाव खंडेश्वरजवळ असलेल्या बोरी येथील मदर स्टेशनवरुन आम्ही सीएनजी घेण्यास सुरूवात केली आहे. ही वायुवाहीनी मुंबई, नागपूर ते ओरीसा राज्यातील झारसुगुडा अशी आहे. त्यामुळे मुंबई आणि झारसुगुडा या दोन्ही ठिकाणावरुन गॅस मिळतो आहे. त्यामुळे अमरावतीत आता चोविस तास मुबलक सीएनजी उपलब्ध होत आहे. सद्या सहा स्टेशन कार्यरत असून ३१ मार्चपुर्वी आणखी सहा स्टेशन सुरू होणार आहेत. अशी माहिती योगेश पारधी, विदर्भ हेड यांनी दिली.

# मराठी शाळा बंदीविरोधात २५ फेब्रुवारीला जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन, जिल्हा अमरावती यांच्या वतीने मराठी शाळा वाचविण्यासाठी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन करण्यात येणार आहे. शिक्षण हक्क कायद्यानुसार विद्यार्थ्यांच्या घरापासून १ किमीमध्ये प्राथमिक, ३ किमीमध्ये उच्च प्राथमिक व ५ किमीमध्ये माध्यमिक शाळा असणे बंधनकारक असताना, कमी पटसंख्येच्या कारणावरून शाळा बंद करण्याचा निर्णय घेतल्याचा आरोप संघटनेने केला आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या नावाखाली शाळा संकुल रचना राबवून ग्रामीण भागातील शाळा ३० किमीपर्यंत दूर हलवल्या जात असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.संघटनेच्या मते, राज्यातील सुमारे १८ हजार शाळा बंद होण्याच्या मार्गावर असून अमरावती जिल्ह्यात १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या २२५ शाळांचा यात समावेश आहे. या शाळा प्रामुख्याने आदिवासी व बहुजन वस्त्यांमध्ये आहेत. शिक्षण अधिकाऱ्यांकडे २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांची माहिती मागितली असता ती देण्यास नकार दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दुसरीकडे खाजगी शाळांची संख्या वाढत असून वाढीव शुल्कामुळे गरीब विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली.संघटनेने शाळा बंदीचा निर्णय रद्द करणे, शिक्षक भरती तातडीने करणे, दत्तक शाळा योजना रद्द करणे, शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करणे, पोषण आहार सुधारणा, शिक्षणावरील खर्च ऋउझ च्या ६ टक्क्यांपर्यंत वाढवणे आदी १३ प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. गावकरी, पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन प्रतिक्षा ढोके, धिरज बनकर, सुप्रिया राऊत, दीप सावळे व कैलास चव्हाण यांनी केले आहे.

# बडनेरा-नाशिक-बडनेरा मेमू १५ जुलैपर्यंत

## मध्य रेल्वे विशेष गाड्यांची वेळ वाढवणार; उन्हाळी विशेष गाड्या म्हणून चालवणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मध्य रेल्वे विशेष गाड्यांची वेळ वाढवून त्यांना विशेष गाड्या, होळी विशेष आणि उन्हाळी विशेष गाड्या म्हणून चालवणार आहे. रेल्वेच्या एकूण विशेष सेवांची संख्या वाढवण्यात आली असून अमरावतीकर प्रवाशांसाठी गाडी क्र. ०१२११ बडनेरा - नाशिक दैनिक विशेष (१३७ फेऱ्या) तर गाडी क्र. ०१२११ नाशिक-बडनेरा (१३७ फेऱ्या) अशा एकूण २७४ फेऱ्या करणार आहे. त्यामुळे अमरावती व बडनेरा येथील प्रवाशांना संत नगरी शेगांव, भुसावळ आणि नाशिक येथे जाणाऱ्या भाविकांसाठी विशेष सोय झाली आहे. प्रथमच या मेमूचा संपूर्ण उन्हाळ्यासाठी कालावधी वाढवण्यात आला आहे.

ही मेमू वेगाने धावते तसेच




मार्गातील सर्वच स्टेशनवर थांबा घेते. मुर्तिजापूर, अकोला, शेगांव, जलंब, नांदुरा, मलकापूर अशा लहान स्टेशनवरही थांबा घेत असल्यामुळे उन्हाळ्यात कोणत्याही कामानिमित्त प्रवाशांना जायचे असल्यास या अनारक्षित ट्रेनचा वापर करता येईल. कारण, अमरावती व बडनेरा स्थानकावरून १० वाजताच्या सुमारास शेगांव, भुसावळकडे निघणारी एकही रेल्वे गाडी नाही. त्यामुळे ही मेमू संतनगरी शेगावकडे जाण्यासाठी तर फारच उपयोगाची आहे. शेगांवला ही ट्रेन सकाळी ११.३३ वाजता पोहोचते. त्यामुळे भाविकांना दर्शनासाठी ही वेळ सोयीची आहे. त्याचप्रमाणे भुसावळ येथे दु. ३.०५ वाजता पोहोचते. त्यानंतर नाशिक रोड येथे रात्री ७.०५ पर्यंत पोहोचत असल्याने त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी तसेच अनेकांना नातेवाईकांना भेटण्यासाठी ही ट्रेन फारच उपयोगाची आहे.

अमरावती स्थानकावरून स. ९ ते ९.३० दरम्यान निघते बडनेरा-नाशिक मेमू असे या गाडीचे नाव असले तरी ही अमरावती मॉडेल रेल्वे स्थानकावर दुरुस्ती, रखरखाव, स्वच्छता तसेच पाणी भरण्यासाठी रोज येत असते. तसेच मेमूचे चालकही अमरावती येथूनच स्वार होतात. त्यामुळे अमरावती स्टेशनवरूनच ही मेमू स. ९ ते ९.३० दरम्यान बडनेराच्या दिशेने निघते. प्रवाशांना याची माहितीच नसल्याने अमरावती येथील अनेक प्रवासी हे बडनेरा येथे खासगी वाहनाने किंवा शहर बसने जातात व तेथून या रेल्वे गाडीत बसतात. कारण, ट्रेनला बडनेरा स्टेशनवर पोहोचण्यासाठी १५ मिनिटे लागतात.

# श्री क्षेत्र सालबर्डी यात्रेत शस्त्रसाठा जप्त; मोर्शी पोलिसांची धडक कारवाई

## महाशिवरात्री यात्रेदरम्यान तलवारी, रामपुरी चाकू व गुप्त्या जप्त; एक आरोपी अटकेत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ सालबर्डी**

श्री क्षेत्र सालबर्डी येथे महाशिवरात्री पर्वानिमित्त सुरू असलेल्या भव्य यात्रेदरम्यान मोर्शी पोलिसांनी मोठी कारवाई करत घातक शस्त्रसाठा जप्त केला आहे. दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ पासून सुरू असलेल्या यात्रेत राज्यभरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत आहेत. गर्दीचा फायदा घेत काही जणांकडून अवैध कृत्ये होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलिसांनी विशेष बंदोबस्त तैनात केला आहे.पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने १५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.१५ ते ११.०५ वाजताच्या दरम्यान सालबर्डी-डोंगरयावली रोडवरील बजरंगी पार्किंगजवळ गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई केली. यावेळी जौहरसिंग दयासिंग जुने (वय ३८, रा. गुरुनानक नगर, तळेगाव (शा.पं.), ता. आष्टी, जि. वर्धा) यास ताब्यात घेण्यात आले.आरोपीकडून एकूण ५ तलवारी (खुकरी), १ रामपुरी चाकू व ३ गुप्त्या असा एकूण ८ हजार ४०० रुपयांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. संबंधित आरोपीविरुद्ध शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक आकाश शिवणकर व त्यांच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.दरम्यान, यात्रेकरूंना पोलिसांनी सतर्कतेचे आवाहन केले आहे. गर्दीत मौल्यवान वस्तू, दागिने, पर्स, मोबाईल आदींची चोरी होण्याची शक्यता लक्षात घेता भाविकांनी काळजी घ्यावी. कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास सालबर्डी पोलीस चौकीत संपर्क साधावा किंवा ११२ या आपत्कालीन क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी संघटन मजबूत करा - जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांचे कार्यकर्त्यांना आव्हान

## काँग्रेस भवन येथे कार्यकारिणीची संघटनात्मक बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या वतीने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस भवन येथे संघटनात्मक आढावा बैठक उत्साहात पार पडली. बैठकीस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी प्रमुख मार्गदर्शन करत कार्यकर्त्यांना निवडणुकांसाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले. यावेळी खासदार बळवंत वानखडे यांची प्रमुख उपस्थिती होती व हरिभाऊ मोहोड, सुधाकरराव भारसाकळे, प्रकाशराव काळबांडे,कांचनमालाताई गावंडे,रामेश्वरराव अभ्यंकर,प्रवीणभाऊ मनोहर, दयारामजी काळे,राहुल येवले यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख




म्हणाले, आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांवर काँग्रेसचा झेंडा फडकवायचा हा आपला निर्धार आहे. त्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्याने गावपातळीपर्यंत संघटन मजबूत करणे गरजेचे आहे. बूथ प्रमुखांनी आपापल्या क्षेत्रात सक्रिय राहून मतदारांशी सातत्याने संपर्क ठेवावा. विरोधकांना आपली ताकद दाखवण्याची हीच योग्य वेळ आहे. संघटनात्मक बांधणी, नव्या कार्यकर्त्यांची नोंदणी आणि गावनिहाय नियोजन यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.बैठकीत खासदार बळवंतराव वानखडे यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. संघटनाची मजबुती हीच निवडणूक विजयाची गुरुकिल्ली आहे. ग्रामीण भागात काँग्रेसची पकड अधिक भक्कम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम केले पाहिजे. जनतेच्या प्रश्नांवर लढा देत भाजपाला त्यांची जागा दाखवण्याची वेळ आता आली आहे, असे ते म्हणाले.या प्रसंगी नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला.या बैठकीला संजय वानखडे,हरीशभाऊ मोरे, सुनिलभाऊ गावंडे, श्रीकांत बोंडे,साहेबराव भदे,नामदेवराव तनपुरे,बाबाराव बहुरूपी, श्रीकांत झोडपे, दिनेश वानखडे,श्रीधरराव काळे,प्रमोद दाळू,राजू कुरेशी,अनिकेत ढेंगळे,राजेंद्र नागपुरे,सतीशराव हाडोळे,समाधान दहातोंडे, बाबूभाई इनामदार,शोएब खान,राहुल गवई, अमोल होले,सच्चिदानंद बेलसरे, राजेश सेमलकर, बाबुरावजी गावंडे,सुरेश देशमुख,शंतनु सोलव, वैभव वानखडे,रामेश्वर चव्हाण, हेमंतराव येवले,ईश्वर बुंदेले,कलीम भाई, येतेशाम नबील,सुरेश आडे,शेख हैदर,तेजस अभ्यंकर, श्रीनिवास सूर्यवंशी,सिद्धार्थ बोबडे, वैभव वानखडे,देवेंद्रभाऊ पेटकर,भाई देशमुख, श्याम बेलसरे, अतिश शिरभाते,शिवाजी देशमुख, कैलास भाऊ आवारे, अमोल बोरेकर, पोपट, घोडेराव,विलास बोरेकर, बिट्टू मंगरोळे, राहुल बोडखे,किशोर देशमुख,मुकुंदराव देशमुख,सेतूभाऊ देशमुख, श्रीनित राऊत आणि तालुका व शहर पदाधिकारी, बूथ प्रमुख, युवक व महिला आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी निवडणुकांसाठी ठोस रणनीती आखत संघटनात्मक बळकटीचा संकल्प यावेळी करण्यात आला.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत